पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला • वर्ष १६ • अंक ६ • रविवार, दि. १२ जुलै २०२६ •मूल्य ५ •पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 | Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 | Web. http://epaper:citynewssuperfast.com

**सुविचार**

जो दुसऱ्याच्या सुखात आनंद मानतो, तो आयुष्यात कधीही दुःखी होत नाही.




## » थोडक्यात

### डिजिटायझेशनमध्ये विदर्भाची बाजी

**मुंबई:** महाराष्ट्र निवडणूक आयोगाच्या एसआयआर मोहिमेने वेगाचा उत्तरार्ध गाठला असला तरी राज्याच्या प्रशासकीय कामगिरीत कमालीची तफावत समोर आली आहे. १० जुलै २०२६ च्या अधिकृत आकडेवारीनुसार, राज्यातील ९.७८ कोटी मतदारांच्या या महाअभियानात मुंबई-ठाण्यासारख्या महानगरांमध्ये कोट्यवधींची आणि हजारो बीएलओची 'फौज' दिमतीला असूनही ही महानगरे कासवगतीवर आहेत. याउलट कमी मनुष्यबळ आणि विपरीत परिस्थिती असलेल्या मराठवाड्याने फॉर्म वाटपात आपला डंका वाजवला आहे, तर डिजिटायझेशनमध्ये विदर्भाने बाजी मारली आहे.

### माजी खा.विनायक राऊतांच्या सुनेचे थक्क करणारे आरोप

**मुंबई:** माजी खासदार विनायक राऊत आणि त्यांच्या कुटुंबावर सून गिरीजा राऊत यांनी केलेल्या गंभीर आरोपांनंतर आता राऊत विरुद्ध सून असा थेट वाद पेटला आहे. माजी खासदार विनायक राऊत यांनी आपल्यावरील सर्व आरोप फेटाळून लावत सुनेने १२ कोटी रुपये मागितल्याचा आरोप केला आहे. माजी खासदार विनायक राऊत यांनी सुनेचे सर्व आरोप खोटे असल्याचे सांगत म्हटले आहे की, गिरीजा राऊत गेल्या ३ वर्षांपासून पती गितेश राऊत यांच्यासोबत राहत नाहीत.

## टीडीआरच्या वापरावर आणि हस्तांतरणावर स्थगिती

# सरकारी जमीन निघाल्यास हातोडा चालण्याची भिती वाढली!

## एसएस जीनच्या शंभर फ्लॅट धारकांमध्ये कमालीची अस्वस्थता !

प्रतिनिधी १२ जुलै

**अकोला :** महानगरपालिका क्षेत्रातील सरकारच्या कोट्यावधीच्या जमीनीवर गुंठेवारी करत भूखंड घोटाळा आणि टीडीआर च्या गैरवापराचे प्रकरणी राज्याच्या नगर विकास विभागाने आदेश दिला आहे. एस एस जीन प्रकरणात आता फ्लॅटधारक आणि बंगल्याचे मालक मात्र अडचणीत आले आहे.

दरम्यान, या ठिकाणी इतका मोठा घोटाळा झाला असताना खरेदी विक्रीचे व्यवहार सुरु असल्याची माहिती समोर आली आहे. शासनाची नेमकी जागा किती, किती औद्योगिक परिसर, किती डिटीआर येथे मिळाला, किती जागा गुंठेवारीमध्ये नसताना दाखवित ओपन स्पेस, पब्लिक युटिलिटीसाठी सोडली नाही याची खातरजमा करण्याची गरज आहे. या विषयी शासनाचा आदेश आल्याने महापालिका आयुक्तांना चौकशी अहवाल लवकरच सादर करण्यात येईल, अशी माहिती महापालिका नगर रचनाकार साबळे यांनी आर आर सी न्यूज सोबत बोलताना दिली.

सरकारी बगीच्या मागील एस एस जीन प्रकरणात महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने अकोला महानगरपालिका आयुक्तांना पत्र पाठवून या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून तातडीने अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. इतक्यावर राज्य सरकार थांबले नसून अकोला



महानगरपालिकेद्वारे जारी करण्यात आलेल्या डीआरसी क्र. ३२ अंतर्गत टीडीआरच्या वापरावर आणि हस्तांतरणावर तात्काळ स्थगिती देण्यात आली आहे. शिट क्र. २९ अ आणि २९ बी मधील १४ एकर शासकीय मालकीच्या, परंतु भाडेपट्टा संपलेल्या जमिनीवर झालेल्या बेकायदेशीर गुंठेवारी आणि बांधकामाची उच्चस्तरीय चौकशी करण्याबाबत नगर विकास विभागाने आदेश काढत चौकशीचे सुरु केली आहे.

या ठिकाणी मोठ मोठ्याल्या अपार्टमेंट बांधण्यात आले असून यात शंभर परिवाराना त्या विकल्याची माहिती आहे. त्याच बरोबर या परिसरात मोठे बंगले असून ते सरकारी जागेत बांधले गेले आहे. इतकेच नाही तर त्यांना लोन दिल्याने बँका देखील अडचणीत सापडल्या आहे. बहुमंजली अपार्टमेंट आणि बंगल्यांच्या मालकांची कोट्यावधीची फसवणूक झाली असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, या सर्व प्रकरणात आता जमीनीचे कथित मालक कमी फ्लॅटधारक आणि बंगल्याच्या मालकांमध्ये फसवणूक झाल्याची चर्चा सुरु झाली आहे. यात कितपत तथ्य आहे याचा लवकरच खुलासा होईल.

> “ महाराष्ट्रशासनाचे पत्र दि ३ जुलै २०२६ नुसार त्याच्यामध्ये डीआरसी नंबर ३२ चा जो काही उल्लेख केलेला आहे, त्या ३२ चा अभिलेख ढोबळमानाने तपासला असता डीआरसी क्रमांक ३२ ही मोहनलाल शंकरलाल लोहिया यांच्या नावाचा असल्याचे दिसून येते. व इतर इतर जी डिटेल जी छाननी आहे तपशीलवार करण्यात येतील. ज्याच्यावर महापालिकेला कारवाई करणे अपेक्षित आहे, ती कारवाई सविस्तर तपासून माननीय आयुक्त यांच्याकडे प्रस्तावित करण्यात येईल.
>
> **- साबळे, नगररचनाकार, मनपा. अकोला.**

## निवडणूक आयोगाच्या कामात खाजगी व्यक्तींचा हस्तक्षेप?

प्रतिनिधी १२ जुलै

**पातूर :** पातूर शहरात प्रभाग क्रमांक 10 मध्ये निवडणूक आयोगाच्या अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाच्या कामाबाबत धक्कादायक प्रकार समोर आल्याचा आरोप होत आहे. नागरिकांच्या घरी जाऊन गणना प्रपत्र (Enumeration Form) वितरित करण्याचे काम अधिकृत बूथ लेव्हल ऑफिसर (BLO) यांनी स्वतः करण्याऐवजी चक्क खाजगी व्यक्तींना मजुरी देऊन केल्याची प्रकार उघडकीस आला असून या प्रकारामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार मतदार यादीसंदर्भातील कामे अत्यंत गोपनीय आणि जबाबदारीची मानली जातात. अशा परिस्थितीत हे काम अनधिकृत किंवा खाजगी व्यक्तींमार्फत करून घेतले जात असल्याचा आरोप अत्यंत गंभीर मानला जात आहे. नागरिकांची वैयक्तिक माहिती आणि निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवरही त्यामुळे प्रश्न उपस्थित होत आहेत. या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधित BLO यांनी खरोखरच खाजगी व्यक्तींमार्फत काम करून घेत आहे तसेच यासाठी कोणाची परवानगी होती, याचा खुलासा करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. या गंभीर प्रकरणाकडे पातूरचे तहसीलदार आणि संबंधित निवडणूक प्रशासन कोणती भूमिका घेणार, दोषींवर कारवाई होणार का, याकडे आता संपूर्ण पातूर तालुक्याचे लक्ष लागले आहे. नियमांचे उल्लंघन झाल्याचे सिद्ध झाल्यास संबंधितांवर कठोर प्रशासकीय कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

## आमिर खान लव्ह जिहादचा ब्रँड ॲम्बेसेडर आहे?

प्रतिनिधी १२ जुलै

**मुंबई:** आमिर खानचा तिसरा विवाह सोहळा काही दिवसांपूर्वी पार पडला. अशा काही गोष्टी जेव्हा घडतात तेव्हा या लोकांकडे 'लव्ह जिहाद'चा ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून पाहायचे का ? ही चर्चा हळूहळू वाढत चालली आहे. हिंदू समाज बांधवांनी सावधान रहावे, असे 'लव्ह जिहाद'चा ब्रँड ॲम्बेसेडर कुठेही दिसले तर यांचे चित्रपट पाहायचे का हे देखील ठरवायला हवे, असे मंत्री नीतेश राणे यांनी म्हटले आहे.

नीतेश राणे म्हणाले की, मशिदीमध्ये ज्या ज्या वेळी आर्थिक घोटाळे झाले त्यावेळी हज यात्रेबद्दल अनेक तक्रारी आल्या त्यावेळी यांना मशिदीबाहेर जात इस्लाम रक्षा किंवा कुराण वाचावे असे या लोकांना वाटले नाही. हिंदू धर्माची बदनामी करण्याची कुठलीही संधी ही औरंगजेबाची पिलावळ कधीच सोडणार नाही. हिंदू धर्माला बदनाम करण्याची सुपारी या पिलावळीला मिळाली आहे. जेवढी हिंमत हे आमच्या हिंदू धर्माला बदनाम करण्यासाठी दाखवतात, तेवढीच हिंमत हज यात्रेमध्ये जे काही चुकीचे प्रकार होतात, याविरोधात दाखवले पाहिजे.



# एफडीएचा केवळ छोट्या मेडिकल स्टोअर्सवरच बडगा ?

## मोठे होलसेलर्स आणि डॉक्टरांचे 'कमिशन नेटवर्क' मोकाट !

प्रतिनिधी १२ जुलै

**अकोला :** अन्न व औषध प्रशासनाकडून सध्या राज्यातील छोट्या केमिस्ट आणि ड्रगिस्टवर किरकोळ चुकांसाठी कडक कारवायांचा धडाका सुरू आहे. मात्र, दुसरीकडे औषध बाजारातील मूळ पाळेमुळे असलेल्या मोठ्या होलसेल विक्रेत्यांकडे जाणीवपूर्वक डोळेझाक केली जात असल्याचा गंभीर आरोप आता छोट्या मेडिकल चालकांकडून केला जात आहे. 'छोट्या दुकानदारांना त्रास देणे बंद करा आणि थेट डॉक्टरांशी लागेबांधे असलेल्या मोठ्या माशांवर कारवाई करा,' असा संतप्त सूर सध्या औषध विक्रेत्यांमध्ये उमटत आहे. ज्या भागात रुग्णांना औषधे मिळत नाही तिथे छोटे मेडिकल दूकानदार रुग्णहितार्थ काम करतात.

पण, बड्या होलसेल विक्रेत्यांच्या नेटवर्कचे काय असा प्रश्न उपस्थित होत आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बाजारातील मोठे औषध होलसेल विक्रेते थेट डॉक्टरांना आणि त्यांच्या हॉस्पिटल्सना अटॅच असलेल्या मेडिकल स्टोअर्सना मोठ्या प्रमाणावर विशिष्ट औषधांचा पुरवठा करत आहेत. अनेक ठिकाणी तर डॉक्टरांना थेट लाखो रुपयांचे कमिशन देऊन औषधे विकली जात असल्याचे बोलले जाते. नियमांनुसार औषधांची विक्री ही परवानाधारक केमिस्टच्या माध्यमातूनच ग्राहकांपर्यंत पोहोचणे गरजेचे असताना, हे थेट 'होलसेलर-टू-डॉक्टर' नेटवर्क राजरोसपणे सुरू आहे.

### किती डॉक्टरांवर झाली कारवाई ?

» अन्न व औषध प्रशासनाचा औषध विभाग छोट्या दुकानांवर तपासणीचे सत्र राबवतो, पण आजपर्यंत या संपूर्ण रॅकेटमध्ये सामील असलेल्या किती बड्या डॉक्टरांवर किंवा कॉर्पोरेट हॉस्पिटल्सवर एफडीएने ठोस कारवाई केली ? हा आता मोठा प्रश्न बनला आहे. डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनच्या नावाखाली औषधांचा काळाबाजार आणि अव्वाच्या सव्वा किमतीत विक्री सुरू असताना, एफडीएची यंत्रणा सुस्त का, असा सवाल नागरिकही विचारत आहेत.

### तर 'मोठे घबाड' बाहेर येणार !

» औषध क्षेत्रातील जाणकारांच्या मते, एफडीएने जर आपला मोर्चा केवळ छोट्या किरकोळ विक्रेत्यांवरून हटवून मोठ्या होलसेल एजन्सीज आणि त्यांच्या गोदामांवर वळवला, तर औषध खरेदी-विक्रीतील कोट्यवधी रुपयांचे मोठे घबाड आणि कमिशनचे काळे साम्राज्य उघडकीस येऊ शकते. छोट्या मेडिकल चालकांचे म्हणणे आहे की, प्रशासनाने त्यांना विनाकारण त्रास देणे थांबवावे. औषध व्यवसायातील पारदर्शकता टिकवायची असेल, तर केवळ छोट्यांवर कारवाईची मलमपट्टी न करता, या संपूर्ण मोठ्या कमिशन नेटवर्कच्या मुख्य सूत्रधारांवर म्हणजेच बड्या होलसेलर्सवर आणि डॉक्टरांवर कडक कायदेशीर बडगा उगारण्याची वेळ आता आली आहे.


# नगरविकास खात्यावर 'कॅग'ने ओढले ताशेरे!

## आरोग्य खात्यावरही ठपका

प्रतिनिधी १२ जुलै

**मुंबई :** नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (कॅग) यांनी २०२४-२५ च्या राज्य वित्त लेखापरीक्षण अहवालात नगरविकास विभागावर ताशेरे ओढले आहेत. या अहवालानुसार या विभागाची तब्बल ११,०४० कोटी रुपयांची उपयोगिता प्रमाणपत्रे प्रलंबित आहेत, जी सर्व सरकारी विभागांपेक्षा अधिक आहेत. तसेच आहरण व वितरण अधिकारी (डीडीओ) यांच्या बँक खात्यांमध्ये ७,९७० कोटी रुपये हे खर्च न करता पडून होते.

इतक्या मोठ्या प्रमाणात सार्वजनिक निधी निष्क्रिय अवस्थेत पडून राहणे, हे आर्थिक नियंत्रणातील कमकुवतपणा व निधीच्या अपुऱ्या देखरेखीचे द्योतक असल्याचे अहवालात म्हटले आहे. अहवालात इतर अनेक विभागांतील आर्थिक अनियमिततेकडेही लक्ष वेधण्यात आले आहे. वैद्यकीय शिक्षण व औषध विभागामध्ये २,२१२.४३ कोटी रुपयांची आकस्मिक बिले प्रलंबित असून त्याचा मोठा भाग हाफकिन बायो-फार्मास्युटिकल्समार्फत करण्यात आलेल्या खरेदीशी संबंधित असल्याचे म्हटले आहे. जलसंपदाकडे ३,६०१.८३ कोटी रुपयांची उपयोगिता प्रमाणपत्रे प्रलंबित असून, निधीचे अविवेकी पुनर्विनियोजन केल्याबद्दलही या विभागावर ताशेरे ओढले आहेत.







शेती आणि शेतकऱ्यांच्या विकासाची जाण असलेले मा. आमदार रणधीर सावरकर यांच्या नेतृत्वात “शेतकरी कर्जमाफीसाठी” महायुती शासनातील आमदारांचे मा. मुख्यमंत्री यांना आग्रही मागणीचे निवेदनाची दखल.

मा. ना.श्री. देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या व्यापक हिताचा निर्णय घेऊन “महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्ज मुक्ती योजना – २०१९ मधील १३ लाख शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर ५० हजार रुपयांऐवजी २ लक्ष रुपयांपर्यंत कर्जमाफीच्या ऐतिहासिक निर्णयाची घोषणा केल्याबद्दल **देवाभाऊ** व शेतकरी ग्रामीण व सर्व सामान्यांच्या प्रश्न सोडविण्यासाठी विधिमंडळाचे तत्पर नेतृत्व **मा. आ. रणधीर सावरकर** यांचे **आभार व धन्यवाद !**



विनीत : समस्त भाजपा जिल्हा मंडळ, विविध आघाडी पदाधिकारी, कार्यकर्ता, बुथ प्रमुख, बुथ समिती अकोला ग्रामीण व महानगर

सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा २
रविवार, दि. १२ जुलै २०२६ Web. http://epaper.citynewssuperfast.com

# “माणसं भ्रष्ट, विकाऊ व अनैतिक झाल्यास दुसरं काय होणार...!”

देशात नीट परीक्षेच्या पेपर फुटीचा मुद्दा ताजा असतांना आता महाराष्ट्रात टीईटी म्हणजे शिक्षक पात्रता परीक्षेचा पेपर फुटल्याचे प्रकरण उघडकीस आले. त्यामुळे नीट परीक्षेप्रमाणे टीईटीची परीक्षा रद्द करण्यात आली असून ती पुन्हा घेतली जाणार आहे.देशात अनेक घोटाळे, ढग फुटीसारखे पेपर, आमदार व खासदार फुटीचे जणू सत्रच सुरू आहे. त्यासाठी कोट्यवधी रुपये वाटले जात आहेत. कारण देशातला माणूस विकाऊ, भ्रष्ट व अनैतिक होत चालला आहे.

शिक्षण व्यवस्था शिक्षण सम्राटांच्या ताब्यात:

देशातील शिक्षणव्यवस्थेत पारंपरिक व मूलभूत विषयांची आणि अभ्यासक्रमांची जागा नव्या विषय व अभ्यासक्रमांनी घेतली आहे. या नवीन अभ्यासक्रमातून ज्ञान, प्रज्ञा, विवेक, शहाणपण व विद्वत्ता हद्दपार होत आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व विषयातील सखोल ज्ञान इत्यादीचे महत्व कमी होऊन फक्त पेपर मध्ये मिळविलेल्या गुणांच्या टक्केवारीवर मेरिट म्हणजे गुणवत्ता गणली जात आहे. त्यामुळे दहावी बारावी आणि त्यानंतर होणाऱ्या स्पर्धा परीक्षा, वैद्यकीय व इंजिनिअरिंग क्षेत्रात करिअर करण्यासाठी होणाऱ्या नीट, एम.एच.सी. ई. टी. आणि इतर पात्रता परीक्षांमध्ये गुणांची टक्केवारी महत्त्वाची ठरत आहे. ही गुणांची टक्केवारी कमविण्यासाठी कोचिंग क्लासेसचा बाजार सुरू झाला.

शाळा महाविद्यालयापेक्षा कोचिंग क्लासेसचे महत्त्व वाढले. या कोचिंग क्लासेसचे संचालक तथाकथित शिक्षण सम्राट झाले आणि त्यांनी संपूर्ण शिक्षण व्यवस्था वेठीस धरून त्यावर आपले अधिराज्य निर्माण केले.

दहावी बारावी झाल्यानंतर आपलं करिअर उभं व्हावं म्हणून विद्यार्थ्यांनी “कोचिंग क्लास यश हमखास” असं मानून शाळा महाविद्यालयात केवळ नावापुरता प्रवेश घेऊन संपूर्ण दिवस कोचिंग क्लासेस अटेंड करायला प्रारंभ केला. कोचिंग क्लासेसचे वाढते फंड लक्षात घेऊन कोचिंग क्लासेसची संख्या वाढली आणि त्यांच्यात स्पर्धा सुरू झाली. परिणामी या क्लासवाल्यांनी आपला क्लास कसा चांगला आहे हे दाखविण्यासाठी लाखो रुपयांच्या जाहिराती करायला सुरुवात केली. पण केवळ जाहिरातीमुळे क्लास प्रसिद्ध होणार नाही हे ओळखून क्लास व यशाची हमी द्यायला प्रारंभ झाला आणि त्यातूनच मग पेपर फुटीचे एक फार मोठे रॅकेट सक्रिय झाले.

पेपरफुट नित्याचीच बाब पण :

शिक्षणसम्राटांनी शिक्षणाचा बाजार मांडून शिक्षणाचे व्यावसायिकरण केले. त्यामुळे संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवर त्यांनी आपले वर्चस्व निर्माण केले. त्यातच शिक्षण व्यवस्थेतील माणसं विकाऊ झाल्यामुळे संपूर्ण शि क्षण व्यवस्थेत भ्रष्टाचाराचा अतिरेक झाला. परिणामी दहावी, बारावी, नीट, एमपीएससी, युपीएससी आणि इतर स्पर्धा परीक्षांचे पेपर फोडून कोट्यवधी रुपये कमविणे सुरू झाले. तसं पाहाल तर कोचिंग क्लासमुळे पेपरफुट नित्याची बाब झाली होती पण ती उघड होत नव्हती. मात्र या वर्षीच्या नीट परीक्षेचे पेपर फूट प्रकरणात पी.व्ही. कुलकर्णी आणि रेणुकाई करिअर सेंटरचा संस्थापक शिवराज मोटेगावकर यासह इतर लोकांचा सहभाग असल्याचे उघड झाल्यामुळे पेपर फुटीमागे कोचिंग क्लासेसची स्पर्धा असल्याचे सिद्ध झाले.

**नवीन शैक्षणिक धोरण व शिक्षणाचा दर्जा :**

देशात नवीन शैक्षणिक धोरणाचा खूप गाजावाजा करण्यात आला. या धोरणामुळे शिक्षणाची ५+३+३+४ अशी नवी रचना लागू केली. प्राथमिक शिक्षणाचे माध्यम मातृभाषा किंवा स्थानिक भाषा असावे, यावर विशेष भर देण्यात आला. इयत्ता ६ वी पासूनच व्यावसायिक शिक्षण उदा. कोडिंग, हस्तकला, इ. आणि इंटर्नशिपची सोय करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांचे सतत मूल्यमापन केले जाईल आणि पाठांतरावर भर न देता तर्कशुद्ध विचारसरणी तपासली जाईल तसेच पदवी अभ्यासक्रमात विद्यार्थी एका वर्षात ‘सर्टिफिकेट’, दोन वर्षांत ‘डिप्लोमा’ मिळवून बाहेर पडू शकतात आणि ३ किंवा ४ वर्षांची पदवी पूर्ण करू शकतात असे बदल करून शैक्षणिक क्रांती घडवून आणल्याच्या गप्पा मारल्या गेल्या. पण वास्तव वेगळं आणि भयावह असल्याचे दिसून येत आहे, कारण नव्या शैक्षणिक धोरणामुळे शिक्षणव्यवस्थेचे पार वाटोळे होत असल्याचा अनुभव येत आहे.

अभ्यासक्रम बदलाच्या नावाखाली नव्या पिढीमध्ये विवेक, वैचारिकता, चिकित्सक वृत्ती, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि प्रश्न विचारण्याची क्षमता वृद्धिंगत होणार नाही याची काळजी घेऊन गुलामीची मानसिकता व भेदाभेद निर्माण करणारे आणि मनुस्मृतीच्या आधारावर अभ्यासक्रम तयार करून ते लादले जात आहेत. देश नव्या वळणावर व गतीने पुढे जात असल्याचा कितीही थिंडोरा पिटला जात असला तरी देशातील विद्यापीठांचा दर्जा खालावत आहे, हे सत्य नाकारता येत नाही.

**पेपर फुटीची नैतिक जबाबदारी :**

विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या नीट परीक्षेचा पेपर फुटला. त्याचा लाखो विद्यार्थ्यांना भुर्दंड सहन करावा लागला.

अनेक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या पण याबाबत सरकारला काहीही देणंघेणं नसून कोणतेही दुःख वाटले नाही. त्यामुळेच देशात घडणाऱ्या पेपर फूट व घोटाळ्यांची नैतिक जबाबदारी स्वीकारून सरकारने कोणतीही ठोस भूमिका घेतली नाही किंवा संबंधित खात्याच्या मंत्र्यावर किंवा अधिकारी वर्गावर कुठलीही कारवाई केली नाही. आता शिक्षकांसाठी असलेल्या सीईटीचा पेपरही फुटला, यावरून देशाची आणि राज्याची शिक्षणव्यवस्था किती बेजबाबदार झाली हे सिद्ध होते.

ज्या देशातील शिक्षण व्यवस्थेत भ्रष्टाचार वाढतो त्या देशाचे भवितव्य धोक्यात असते. कारण त्या देशातील माणसं भ्रष्ट, अनैतिक व लाचार होतात. त्यांच्यात स्वाभिमान, देशभक्ती, मैत्री, करुणा, संवेदनशीलता, जबाबदारी व कर्तव्याचे भान नसते. त्यामुळे गुन्हेगारी वाढून अराजक निर्माण होते. हा अनुभव याची देही याची डोळा देशातील लोकांना येत आहे पण ते मूग गिळून गप्प आहेत ही फार मोठी वैचारिक दिवाळखोरी व शोकांतिका आहे.

प्रा. डॉ. एम. आर. इंगळे,
विभागीय सचिव डाटा अकोला

# गर्भवती आणि स्तनदा मातांच्या आरोग्याबद्दल समाजात जनजागृतीची गरज!



दरवर्षी १० जुलै रोजी मातृ सुरक्षा दिन पाळला जातो. गर्भवती आणि स्तनदा मातांच्या आरोग्याबद्दल समाजात जागृती निर्माण करणे, प्रसूतीदरम्यान होणारे माता मृत्यूचे प्रमाण कमी करणे आणि दोन अपत्यांमध्ये योग्य अंतर राखण्याबाबत मार्गदर्शन करणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. मातृ सुरक्षा दिनाचे महत्त्व आणि इतिहासमाता आणि नवजात बालकांचे आरोग्य सुरक्षित राखण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेने २००५ मध्ये या दिवसाची सुरुवात केली. ११ जुलै रोजी साजरा होणाऱ्या ‘जागतिक लोकसंख्या दिना’च्या आदल्या दिवशी हा दिवस निवडण्यामागे लोकसंख्या वाढ आणि मातांचे आरोग्य यांचा परस्पर संबंध स्पष्ट करणे हा हेतू आहे. अनेकदा गरोदरपणातील रक्तदाब, रक्ताची कमतरता (ॲनिमिया) आणि प्रसूतीदरम्यान होणारा अतिरक्तस्त्राव यामुळे मातांच्या जीवाला धोका निर्माण होतो.

‘स्त्री ही क्षणाची पत्नी आणि अनंत काळाची माता असते’ हे आपण अनेक वर्षे ऐकत आलो आहोत. आई ही कुटुंबाचा आणि समाजाचा आधारस्तंभ असून, निरोगी माता म्हणजे निरोगी कुटुंब आणि सुदृढ समाज असल्याचे मानले जाते. त्यामुळे गर्भधारणेपासून प्रसूतीनंतरच्या काळापर्यंत मातेच्या आरोग्याची योग्य काळजी घेणे ही केवळ कुटुंबाची नव्हे, तर संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. याच उद्देशाने जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) मातांचे आरोग्य सुरक्षित राखण्यासाठी २००५ पासून दरवर्षी १० जुलै हा दिवस ‘मातृ सुरक्षा दिन’ म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे सुरक्षित मातृत्वाविषयी जनजागृती करणे, गर्भवती महिलांना वेळेवर आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे आणि माता व बालमृत्यूचे प्रमाण कमी करणे हे आहे. प्रत्येक स्त्रीने गर्भधारणेदरम्यान नियमित आरोग्य तपासणी करणे, संतुलित आहार घेणे, आवश्यक लसीकरण करणे, रक्तदाब व हिमोग्लोबिनची तपासणी करणे, तसेच डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य उपचार घेणे हे अत्यंत आवश्यक आहे.

पूर्वीच्या काळी बाळंतपणे घरात होत असत. त्याकाळी सुईण बोलावून गरोदर स्त्रीची प्रसूती होत असे.पण असे करणे धोक्याचे असे. यामुळे त्या स्त्रीच्या व बाळाच्या जीवाला नकळत धोका पोहोचण्याचा संभव असे. तसेच त्याकाळी जन्माला येणाऱ्या अपत्याच्या वयात अवघे एक ते दीड वर्षाचे अंतर असे. यामुळे त्या स्त्रीच्या आरोग्याला धोका पोहोचत असे. तर कधी आठ ते दहा बाळंतपणे झाल्यामुळे त्या स्त्रीला बाळंतरोग होत असे. आजही महाराष्ट्रातील काही ग्रामीण भागात घरातच जन्म होत आहेत. गरोदर स्त्रीची प्रसूती जर प्रशिक्षित आरोग्य कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत किंवा सुसज्ज आरोग्य केंद्रात झाल्यास आई व बाळ दोघांच्याही सुरक्षिततेची खात्री अधिक वाढते. गेल्या काही वर्षांपासून जरी मातांच्या आरोग्याबाबत काळजी घेतली जात असली, तरी हजारो महिलांनी गरोदरपणात तसेच प्रसूतीनंतर आपला जीव गमावला असल्याचे अनेक अहवालांतून समोर येते. प्रसूतीनंतर मातेला पुरेसा आराम, पौष्टिक आहार, स्तनपानाविषयी मार्गदर्शन आणि नियमित वैद्यकीय तपासणी यांनाही तितकेच महत्त्व आहे. विविध योजनांद्वारे गर्भवती महिलांना मोफत तपासणी, औषधे, लसीकरण आणि सुरक्षित प्रसूतीच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

**पाळण्याच्या दोरीचा फास होऊ नये!**

जर दोन मुलांमधला ‘पाळणा लांबवला नाही’ तर ‘जगाच्या उद्धारासाठी’ तिच्या हाती असलेल्या ‘पाळण्याच्या दोरी’चा तिच्याच ‘गळ्याभोवती फास’ होऊन बसेल. ग्रामीण व दुर्गम भागांमध्ये आरोग्य सेवांबाबत जागरूकता निर्माण करणे ही काळाची गरज असून, मातृसुरक्षा दिन साजरा करणे हा केवळ एक औपचारिक दिवस नसून सुरक्षित मातृत्वाचा संकल्प दृढ करण्याची संधी आहे.

**सुरक्षित प्रसूतीचा लाभ मिळवून देण्यासाठी शासकीय योजना**

शासकीय योजना आणि सुविधामातांना सुरक्षित प्रसूतीचा लाभ मिळवून देण्यासाठी भारत सरकार व महाराष्ट्र शासनामार्फत अनेक महत्त्वपूर्ण योजना राबविल्या जातात.

१) जननी सुरक्षा योजना : गरोदर महिलांना सुरक्षित प्रसूतीसाठी आर्थिक मदत पुरवली जाते.

२) जननी शिशू सुरक्षा कार्यक्रम : शासकीय रुग्णालयांमध्ये गरोदर महिलांना मोफत उपचार, औषधे, आणि प्रवासाची सोय केली जाते. ३) प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान : गरोदरपणाच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या तिमाहीत मातांची मोफत आरोग्य तपासणी केली जाते.

**मातामृत्यू दर केरळमध्ये सर्वात कमी तर आसाममध्ये सर्वाधिक**

मातृमृत्यू दर (एमएमआर) म्हणजे गर्भधारणेचे ठिकाण किंवा कालावधी विचारात न घेता, गर्भधारणा किंवा गर्भपात यामुळे दर १,००,००० जिवंत जन्मांमागे होणाऱ्या मातांच्या मृत्यूंची संख्या. महिलांमधील गर्भधारणेशी संबंधित धोका दर्शविण्यासाठी मातृमृत्यू दराचा वापर केला जातो. सर्वात कमी माता मृत्यूदर असलेले राज्य केरळ आहे, तर सर्वात जास्त माता मृत्यूदर असलेले राज्य आसाम आहे. विशेष म्हणजे पश्चिम बंगाल, हरियाणा, उत्तराखंड आणि छत्तीसगड यांसारख्या राज्यांमध्ये मागील सर्वेक्षणाच्या तुलनेत माता मृत्युदरात वाढ नोंदवली गेली आहे.

# राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड)

**आज स्थापना दिवस**

राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड)

राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) कर्जपुरवठा करून, शेतकऱ्यांना, स्वयं-सहायता गटांना इत्यादींना पाठिंबा देऊन ग्रामीण विकासाला चालना देते. कृषी आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) ही भारताच्या ग्रामीण वित्तीय परिसंस्थेचा आधारस्तंभ आहे. सर्वोच्च विकास वित्तीय संस्था म्हणून, ती भारतातील गावे आणि कृषी क्षेत्रांमध्ये शाश्वत, सर्वसमावेशक आणि न्याय्य विकासाला चालना देण्यासाठी समर्पित आहे. १२ जुलै १९८२ रोजी संसदेच्या कायद्याद्वारे स्थापित, नाबार्डची संकल्पना धोरण, वित्त आणि तळागाळातील अंमलबजावणी यांमधील दरी कमी करून ग्रामीण समृद्धीचा मार्ग प्रशस्त करणारी संस्था म्हणून करण्यात आली होती. महाराष्ट्रातील मुंबई येथे मुख्यालय असलेली नाबार्ड, तेव्हापासून आर्थिक सहाय्य, विकासात्मक उपक्रम आणि संस्थात्मक सुधारणा यांचे एकत्रीकरण करून भारताच्या ग्रामीण परिवर्तनात आघाडीवर राहिली आहे. गेल्या अनेक दशकांमध्ये, ती एका गतिमान संस्थेत विकसित झाली आहे, जी केवळ ग्रामीण पतपुरवठाच सुलभ करत नाही, तर ग्रामीण संस्था, शेतकरी आणि उद्योजकांना वाढत्या स्पर्धात्मक अर्थव्यवस्थेत भरभराटीसाठी सक्षम करते. या लेखात, आपण नाबार्ड, तिची स्थापना, नेतृत्व, मुख्यालय, कार्ये आणि उद्दिष्ट्ये आणि इतर प्रमुख उपक्रमांबद्दल जाणून घेणार आहोत.

राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड)

नाबार्डचे पूर्ण रूप ‘नॅशनल बँक फॉर ॲग्रीकल्चर अँड रुरल डेव्हलपमेंट’ असे आहे. ही भारतातील कृषी आणि ग्रामीण विकासासाठी वित्तपुरवठा करणारी प्रमुख संस्था आहे. ही संस्था ग्रामीण पतपुरवठ्याचे समन्वय आणि देखरेख करते, ग्रामीण वित्तीय संस्थांना पुनर्वित्त पुरवते, पायाभूत सुविधांच्या निर्मितीस साहाय्य करते आणि धोरणात्मक हस्तक्षेपांना मार्गदर्शन करते.


**नाबार्डशी संबंधित प्रमुख मुद्दे** - नाबार्डचा उगम १९७९ मध्ये श्री बी. शिवरामन यांच्या अध्यक्षतेखालील ‘कृषी आणि ग्रामीण विकासासाठी संस्थात्मक पतपुरवठ्याच्या व्यवस्थेचा आढावा घेणारी समिती’ (CRAFICARD) मध्ये शोधता येतो. या समितीने कृषी आणि ग्रामीण विकासाच्या सर्व वित्तपुरवठा कार्यांना एकत्रित करण्यासाठी आणि त्यांचे पर्यवेक्षण करण्यासाठी एकाच, समर्पित संस्थेची गरज अधोरेखित केली होती.

या शिफारशींवर कार्यवाही करत, संसदेने नाबार्ड कायदा (१९८१ चा ६१) संमत केला, ज्यामुळे १२ जुलै १९८२ रोजी या संस्थेची स्थापना झाली. पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या हस्ते झालेले उद्घाटन हे ग्रामीण धोरणातील एक परिवर्तनात्मक क्षण ठरले.

रिझर्व्ह बँकेची (आरबीआय) कृषी पतपुरवठा कार्ये , आणि कृषी पुनर्वित्त आणि विकास महामंडळाची (ARDC) पुनर्वित्त आणि विकास कार्ये. या विलीनीकरणामुळे ग्रामीण विकास वित्तपुरवठा एकाच, विशेष प्राधिकरणांतर्गत केंद्रीकृत झाला, ज्यामुळे उत्तम नियोजन, कार्यक्षमता आणि पोहोच सुनिश्चित झाली.

राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेच्या (नाबार्ड) सदस्यांमध्ये अध्यक्ष हे एक सर्वोच्च पद आहे. २०२६ पर्यंत, श्री. शाजी के. व्ही. हे २०२२ पासून अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. बँकिंग आणि ग्रामीण वित्त क्षेत्रातील अनुभवी असलेले ते, यापूर्वी कॅनरा बँक आणि भारतीय रिझर्व्ह बँकेत वरिष्ठ पदांवर कार्यरत होते. त्यांच्या नेतृत्वाखाली, नाबार्ड ग्रामीण पतपुरवठा, फिनटेक एकीकरण आणि हवामान-अनुकूल कृषी वित्तपुरवठा या क्षेत्रांतील नवनवीन कल्पनांचा स्वीकार करत आहे.

# ईश्वराचे संकेत ओळखा; अन्यथा दुःखाची शाळा सुरु होते



आज अनेकांच्या मनात एक प्रश्न असतो—सज्जन माणसालाच दुःख का मिळते आणि दुर्जन माणूस सुखात का जगतो? आपण एखाद्याची निस्वार्थपणे मदत करतो, वेळ देतो, मार्गदर्शन करतो, प्रेम देतो; पण त्याबदल्यात अपमान, गैरसमज, उपेक्षा आणि वेदना मिळतात. मग मनात प्रश्न निर्माण होतो—”चांगलं करूनही माझंच वाईट का होत आहे?” परंतु हा आपल्या दृष्टीचा भ्रम आहे. आपण जे डोळ्यांनी पाहतो ते क्षणिक असते; त्यालाच माया म्हणतात. पण आपण जे निःस्वार्थ कर्म करतो, त्यातून जो अदृश्य आनंद आणि पुण्य निर्माण होते, त्यालाच परमानंद म्हणतात. ईश्वराच्या न्यायात कोणतेही चांगले कर्म कधीही वाया जात नाही. जसा आपण बँकेत पैसा जमा करतो, तसा तो लगेच दुप्पट होऊन हातात येत नाही. वेळ येते, व्याज मिळते आणि योग्य क्षणी त्याचे फळ मिळते. त्याचप्रमाणे प्रत्येक सत्कर्माचे पुण्य ईश्वर आपल्या जीवनाच्या खात्यात जमा करत असतो. कधी या जन्मात, कधी पुढील जन्मात; पण त्याचे फळ निश्चित मिळते. म्हणून ईश्वरावर संशय करू नका. ईश्वर कधीही अन्याय करत नाही; आपल्याला त्याचा हिशेब समजत नाही एवढेच.

अनेक वेळा आपण एखाद्याला योग्य मार्ग दाखवतो; पण तो ऐकत नाही. तेव्हा निराश होऊ नका. कारण आपण फक्त निमित्त असतो. आपल्या माध्यमातून बोलणारा खरा ईश्वर असतो. आपण देत असलेले ज्ञान हे आपले नसते; ते परमात्म्याने दिलेली देणगी असते. ज्याला स्वीकारायचे आहे तो स्वीकारेल, ज्याला नाकारायचे आहे तो नाकारेल; पण सत्य कधीही बदलत नाही. मी जेव्हा कोणाच्या घरी जातो, कोणाची भेट घेतो किंवा कोणाला मार्गदर्शन करतो, तेव्हा मला एकच भावना असते—मी नाही बोलत; माझ्या अंतःकरणातील परमात्मा बोलत आहे. मी फक्त ईश्वराच्या हातातील एक पत्र आहे. त्या पत्रातील संदेश लोकांपर्यंत पोहोचवणे हेच माझे कर्तव्य आहे. तो संदेश स्वीकारायचा की फाडून टाकायचा, हा निर्णय प्रत्येकाचा स्वतःचा असतो. ईश्वर प्रत्येकाला वेळोवेळी संकेत देत असतो. कधी एखाद्या संताच्या रूपाने, कधी मित्राच्या रूपाने, कधी आई-वडिलांच्या शब्दातून, कधी एखाद्या अनोळखी व्यक्तीच्या माध्यमातून. पण अहंकाराने अंध झालेला मनुष्य ते संकेत दुर्लक्षित करतो. नंतर जेव्हा संकट येते, तेव्हा तो नियतीलाच दोष देतो. याचे एक साधे उदाहरण पाहा. डॉक्टरांनी तापासाठी मुख्य गोळी दिली आणि सांगितले की ही गोळी वेळेवर घ्या. पण आपण तीच गोळी न घेता फक्त इतर गोळ्या घेत राहिलो, तर ताप कमी होईल का? उलट आजार वाढेल आणि शेवटी मोठ्या दवाखान्यात जावे लागेल. दोष डॉक्टरांचा नसतो; आपण त्यांच्या सूचनांकडे दुर्लक्ष केले म्हणून दुःख वाढते. जीवनातही हेच घडते. ईश्वर आधीच सावध करतो; पण आपण ऐकत नाही.

आज पैसा, प्रतिष्ठा, यश आणि ऐश्वर्य यांच्या मागे धावताना माणूस स्वतःलाच हरवून बसला आहे. हातावर ठेवलेले पाणी जास्त वेळ टिकत नाही. तसेच संपत्तीही कायमची राहत नाही. उलट तिचे ओझे इतके वाढते की माणूस स्वतःचे अस्तित्व विसरतो. म्हणून संतांनी संपत्तीचा नव्हे, तर समृद्ध मनाचा मार्ग दाखवला. आपण या पृथ्वीवर का आलो? हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारायला हवा. आईच्या गर्भात असताना आपण परमेश्वराला प्रार्थना केली होती—”मला या जगात पाठव. मी तुझे नाम घेईन, तुझ्या भक्तांची सेवा करीन, प्रत्येक जीवावर प्रेम करीन.” पण जन्म झाल्यानंतर आपण ते सर्व विसरतो. मग ‘माझे’ आणि ‘माझ्यासाठी’ या मोहात अडकतो. आणि इथूनच दुःखाची सुरुवात होते. मी अशा अनेक लोकांना पाहिले आहे ज्यांच्याकडे बंगले आहेत, गाड्या आहेत, पैसा आहे, प्रतिष्ठा आहे; पण मनःशांती नाही. म्हणून ते शेकडो किलोमीटर प्रवास करून एखाद्या संताचे दोन शब्द ऐकण्यासाठी जातात. कारण पैसा शरीराला सुख देतो; पण परमात्म्याचे स्मरण आत्म्याला शांती देते. जसा तुम्हाला रोज अन्न हवे असते, रोज पैसा कमवावा लागतो, तशीच रोज भक्तीही करावी लागते. रोजच्या प्रार्थनेशिवाय मन शुद्ध होत नाही. पैसा जगण्याची साधने देतो; पण भक्ती जगण्याचा अर्थ देते.

# बुरशी लागलेलं अन्न खाणं सुरक्षित आहे का?

आपण सर्वांनी कधी ना कधी ब्रेडवर आलेली बुरशी पाहिली असेल. त्यानंतर असे पदार्थ खावे की नाही असा विचारही मनात आला असेल. परंतु, दरवर्षी मोठ्या घरांमधून प्रमाणात अन्न वाया जातं. यूकेतील घरांमधून तर सुमारे 6.6 दशलक्ष टन अन्न वाया जातं. त्यामुळे कोणत्या प्रकारचं अन्न थोडं सुरक्षितपणे वाचवता येऊ शकतं आणि कोणतं अन्न लगेच कचऱ्याच्या डब्यात फेकून द्यायला हवं, हे समजून घेणं खूप महत्त्वाचं आहे. अन्नावर येणारी बुरशी म्हणजे काय? अन्नावरील बुरशी ही सूक्ष्म बुरशीच्या (कवक) जीवाणूंनी बनलेली असते. ती अन्नामध्ये धाग्यांसारख्या जाळ्याच्या रूपात वाढते, ज्याला मायसेलियम म्हणतात. हे जाळे अन्नाच्या आत शिरून पसरतं, जसं झाडांची मुळं मातीत पसरतात तसं. जेव्हा या बुरशीचे सूक्ष्म कण (स्पोर्स) अन्नाच्या पृष्ठभागातून बाहेर पडतात, तेव्हा अन्नाचा रंग बदलू शकतो आणि त्यावर धुळीसारखा थर दिसू लागतो.

बुरशी धोकादायक आहे का?

आपल्याला आवडणारे काही खाद्यपदार्थ प्रत्यक्षात सुरक्षित बुरशी वापरून तयार केले जातात. उदा. पेनिसिलियम रोक्वेफोर्टी ही बुरशी निळ्या (ब्लू) चीजला त्याच्या निळसर रेघा किंवा शिरा आणि तीव्र चव देते.

तर बोट्रिटिस सिनेरिया ज्याला ‘नोबल रॉट’ असंही म्हणतात. ही द्राक्षांपासून वाइन करण्यासाठी वापरली जाते. ही बुरशी द्राक्षांमधील पाणी कमी करते आणि त्यांचा गोडवा वाढवते. परंतु, याचा अर्थ असा नाही की आपण बुरशी लागलेलं कोणतंही अन्न खाऊ शकतो.

वेगवेगळ्या प्रकारच्या बुरशीचा परिणाम लोकांवर वेगवेगळा असतो. जर तुम्हाला बुरशीची ॲलर्जी असेल, तर तुम्ही विशेष काळजी घ्यायला हवी. फूड स्टँडर्ड्स एजन्सी (एफएसए), बुरशी लागलेलं कोणतंही अन्न न खाण्याचा सल्ला देते.

विशेषतः लहान मुलं, वृद्ध व्यक्ती, गर्भवती महिला आणि ज्यांची रोगप्रतिकारशक्ती कमी आहे त्यांनी अशा अन्नापासून पूर्णपणे दूर राहायला हवं.

मोल्ड (बुरशी-विषयक) तज्ज्ञ डॉ. पॅट्रिक हिकी यांच्या मते, काही अन्न वाचवता येऊ शकतं, पण ते खाण्याचा निर्णय ‘आपल्या स्वतःच्या जबाबदारीवर’ घ्यावा लागतो. डॉ. हिकी यांच्या मते, “बुरशीमुळे लगेच अन्नातून विषबाधा होत नाही”. पण काही बुरशी असे विषारी पदार्थ किंवा द्रव्य तयार करतात, ज्यांना ‘मायकोटॉक्सिन्स’ असं म्हणतात.

जर तुम्ही याचं मोठ्याप्रमाणात सेवन केलं तर “यामुळे पोटाशी संबंधित त्रास होऊ शकतात. तसेच काही वेळा यामुळे यकृत (लिव्हर) किंवा मूत्रपिंड (किडनी) निकामी होण्यासारखे गंभीर परिणाम होऊ शकतात, आणि यामुळे जीवितालाही धोका निर्माण होऊ शकतो.”

ॲस्परजिलस सारख्या काही बुरशी ओलसर धान्य किंवा सुकामेव्यावर वाढतात. या बुरशीमुळे ॲफ्लाटॉक्सिन नावाचं विष तयार होतं. त्यांचा संबंध यकृताच्या कर्करोगाशी (लिव्हर कॅन्सर) जोडलेला आहे. माणसांना अचानक बुरशीजन्य गंभीर विषबाधा होणं फार दुर्मीळ असतं. परंतु, डॉ. हिकी यांच्या मते, लहान प्रमाणात हे विष



वारंवार खाण्यात आल्यास दीर्घकालीन काय परिणाम होतात याबाबत फारशी स्पष्ट माहिती उपलब्ध नाही. ते सांगतात की, “जर हे विष किंवा तो पदार्थ सतत शरीरात जात राहिला, तर त्याचे हळूहळू साठणारे (क्युम्युलेटिव्ह) परिणाम होऊन आजारपण वाढू शकतं, अशी चिंता व्यक्त केली जाते.”

बुरशी लागलेला ब्रेड खाऊ शकतो का?

एफएसए सांगतं की, बुरशी लागलेला ब्रेड खाऊ नये. कारण ब्रेडसारख्या छिद्र असलेल्या (पोरस) पदार्थांमध्ये बुरशी केवळ वर दिसत नाही, तर ती आतपर्यंत पसरलेलीही असू शकते. डॉ. हिकी म्हणतात की, “साधारण नियम असा आहे की अन्नाच्या पृष्ठभागावर जर बुरशीचा 1 सेमी आकाराचा भाग दिसत असेल, तर ती बुरशी आतमध्येही साधारण तितकीच म्हणजे 1 सेमीपर्यंत शिरलेली असते.” जर तुमचा ब्रेड केवळ शिळा झाला असेल आणि त्यावर बुरशी आलेली नसेल, तर तो फेकण्याऐवजी तुम्ही त्यापासून ब्रेडक्रंब्स (ब्रेडचा चुरा) किंवा क्रूटॉन्स (ब्रेडचे कुरकुरीत तुकडे) बनवू शकता. बुरशी लागलेलं चीज खाणं सुरक्षित आहे का?

चेडर आणि पार्मेझानसारख्या चीजवर बुरशी सहज वाढत नाही, कारण त्यात ओलावा किंवा मॉइश्चर कमी असतं. डॉ. हिकी सांगतात की, “जर तुम्हाला त्या कडक चीजवर 5 मिमीपेक्षा लहान बुरशी दिसली, तर त्या भागाभोवतीचा किमान 10 मिमी थर कापून टाकून मगच उर्वरित चीज खावं.”

पण चाकू बुरशी लागलेल्या भागाला स्पर्श करणार नाही याची काळजी घ्यावी, नाहीतर बुरशी इतर भागातही पसरू शकते.

मऊ चीज किंवा जे पसरवता किंवा सहज कुस्करता येतात, ते वेगळे असतात. जर त्यात बुरशी खास तयार करून टाकलेली नसेल, जसं की ब्लू चीजमध्ये बुरशी वाढवली जाते. अशाप्रकारच्या चीजवर बुरशी आली तर ते फेकून द्यावे.

कारण अशा चीजमध्ये पाणी जास्त असतं, त्यामुळे जंतू किंवा सूक्ष्मजीव लवकर वाढतात आणि त्यामुळे साल्मोनेला किंवा लिस्टेरियासारख्या जीवाणूंमुळे अन्नातून विषबाधा होऊ शकते. फळं आणि भाज्यांवरील बुरशीचे काय? घट्ट किंवा कडक फळे आणि भाज्यांवर जर थोडेसे बुरशीचे डाग असतील, तर ती बहुतेक वेळा वापरण्यायोग्य असतात. पण जर ती चिकट किंवा ओलसर म्हणजेच बुळबुळीतपणा आला असेल, तर ती फेकून द्यावीत, कारण असं झालं की त्यात जिवाणू वाढलेलं असू शकतात आणि त्यामुळे अन्नातून विषबाधा किंवा पोटदुखी होऊ शकते.

घट्ट किंवा कडक फळभाज्या (जसं की मुळा, गाजर किंवा कोबी) यावर बुरशी आली असेल, तर खाण्यापूर्वी त्या बुरशीच्या भागाभोवती आणि खाली किमान 1 सेमीपर्यंतचा तो भाग कापून टाकावा. अशा भाज्यांमध्ये ओलावा कमी आणि आम्लता (ॲसिड) जास्त असल्यामुळे बुरशीला आतपर्यंत शिरणं कठीण जातं.

सफरचंदांबाबत मात्र विशेष काळजी घ्यावी. खराब किंवा बुरशी लागलेल्या सफरचंदांमध्ये पॅट्युलिन नावाचं विष असू शकतं. त्यामुळे बुरशी लागलेला सफरचंदाचा रस (ॲपल ज्यूस) कधीही पिऊ नये. काकडी, टोमॅटो आणि पीचसारखी मऊ फळं आणि भाज्या बुरशी लागली असतील तर ती लगेचच फेकून द्यावीत.

कारण त्यात पाण्याचे प्रमाण जास्त असतं, त्यामुळे बुरशी आणि जंतू आतपर्यंत वेगाने पसरू शकतात. थोडीशी सुकलेली किंवा कोमेजलेली सलाडची पानं साधारणपणे खाण्यास योग्य असतात. परंतु, जर त्यावर बुरशी आली असेल किंवा ती चिकट किंवा ओलसर झाली असतील, तर ते खाणं टाळावं. बुरशी लागलेला जॅम खाणं सुरक्षित आहे का? एफएसएने इशारा दिला आहे की, “बुरशीचा भाग आणि त्याच्या आजूबाजूचा मोठा भाग काढून टाकला, तर कदाचित दिसत नसलेले विषही म्हणजेच अदृश्य विषारी घटक निघून जाऊ शकतात. पण याची कोणतीही खात्री नाही.” डॉ. हिकी सुचवतात की, जर जॅमच्या वर थोडी हिरवी बुरशी दिसली, तर वरचा थर आणि त्याखालील काही सेंटीमीटरचा भाग काढून टाकला, तर उरलेला भाग लवकर खाऊ शकतो.

पण काही दिवसांनी ती बुरशी पुन्हा येण्याची शक्यता जास्त असते. तुम्हाला शंका असेल किंवा जॅमवर बुरशीचा जाड थर साचला असेल, तर ते फेकून देणंच योग्य आहे. हीच गोष्ट करी पेस्टच्या जारलाही लागू होते. अन्नाला बुरशी लागण्यापासून कसं रोखाल? तुम्ही अन्नाला पूर्णपणे बुरशी लागण्यापासून रोखू शकत नाही, पण ती लागण्याच्या प्रक्रियेचा वेग नक्कीच कमी करू शकता. बुरशीला उष्ण, ओलसर वातावरण आणि खाण्यासाठी अन्न लागतं. त्यामुळे स्वच्छ, कोरडी आणि चांगली खेळती हवा असलेली स्वयंपाकघरं ठेवली, तर बुरशीपासून काही प्रमाणात दिलासा मिळू शकतो.तुम्ही अन्न कसं साठवता यावर बुरशी लागणं अवलंबून असतं. सलाडची पानं फ्रिजमध्ये हवाबंद (एअरटाइट) डब्यात ठेवावीत आणि त्यात तळाशी पेपर टॉवेल अंथरूण ठेवावा.

# हिवरखेड रेल्वे स्टेशन नाव देऊन मालधक्क्याची सुविधा उपलब्ध करून द्या

## विचार मंच व व्यापा-यांची खासदारांना मागणी

**हिवरेखेड :-** अकोला ते खंडवा या नवीन रेल्वे मार्गाचे निर्माण कार्य होत असून या मार्गावर हिवरखेड परिसरात नवीन रेल्वे स्टेशन निर्मिती होत आहे या रेल्वे स्टेशनला हिवरखेड रेल्वे स्टेशन असे नाव देऊन या स्टेशनवर मालधक्क्याची सुविधा निर्माण करून देण्याची मागणी अकोला लोकसभा मतदारसंघाचे खासदार अनुप धोत्रे यांना हिवरखेड विचार मंच व व्यापारी बांधवांच्या वतीने पत्र देऊन करण्यात आली आहे.

अकोला ते खंडवा असा नवीन रेल्वे मार्ग निर्माण करण्यात आला असून या रेल्वेमार्गाचे काम जोमात सुरू आहे तथा सदर रेल्वे मार्ग हा ब्रॉडगेज असून यामुळे हिवरखेड शहर व परिसर थेट रेल्वेच्या मुख्य मार्गाला जोडल्या जाणार आहे या रेल्वे मार्गावर हिवरखेड येथे नवीन रेल्वे स्टेशनची निर्मितीचे काम सुद्धा सुरू आहे हा रेल्वे मार्ग व्हावा यासाठी अकोला लोकसभा मतदारसंघाचे खासदार अनुप धोत्रे यांनी शर्यतीचे प्रयत्न केले असून त्यांच्या या प्रयत्नांना यश प्राप्त झाले आहे. निवेदनावर हिवरखेड विचार मंच चे संदीप इंगळे, अनिल कराळे, राजेश वानखडे गुरुजी, दिपक रायबोले,बजरंग तिडके, तुषार गावंडे, जितेश कारिया, अर्जुन खीरोडकार, सुरज चौबे, अरुण रहाणे, बाळासाहेब नेरकर, केशव कोरडे यांच्यासह व्यापारी आनंद बोहरा, प्रवीण येऊल, मुन्ना माधानी, पंकज अग्रवाल, धीरज बजाज, अजय मालपाणी यांच्यासह नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



> अकोला ते खंडवा या नवीन रेल्वे मार्गाची निर्मिती सुरू असून सदर मार्ग ह्या ब्रॉडगेज असणार आहे हे काम पूर्ण झाल्यानंतर दुसरी रेल्वे लाईन टाकण्यात येईल व हिवरखेड येथे मलाधक्क्याची सुद्धा सुविधा निर्माण करण्यात येईल.
>
> **खासदार अनुप धोत्रे**

# तालुका कृषी अधिकारी कार्यालयात उद्धवसेनेचा ठिय्या

प्रतिनिधी १२ जुलै



**तेल्हारा :** तालुक्यातील मौजे दहिगाव शेतशिवारात सोयाबीनची पेरणी केली.मात्र निकृष्ट बियाण्यांमुळे सोयाबीन अंकुरले नसल्याने शेकडो शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ आली आहे.त्यामुळे अशा शेतकऱ्यांच्या जीवावर उठणाऱ्या संबंधित कंपनीवर गुन्हे दाखल करण्याची मागणी उद्धवसेनेचे कार्यकर्ते किरण अवताडे यांनी केली.द

९ रोजी तालुका कृषी अधिकारी कार्यालयात यावेळी ठिय्या आंदोलन करण्यात आले. शेतातील सोयाबीन उगवले नसल्याची बाब समोर आली आहे.तेल्हारा तालुक्यातील सुमारे ६५ तक्रारी कृषी विभागाकडे आलेल्या असून त्यापैकी दहिगाव शेतशिवारात सर्वाधिक तक्रारी आहेत. आधीच पाऊस नसल्याने शेतकरी हैराण आहे. त्यात आता बियाणे पुन्हा घेण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. शेतकऱ्यांना योग्य ती मदत करून संबंधित कंपनीवर गुन्हे दाखल करावे.

या मागणीसाठी उद्धवसेनेच्या कार्यकर्त्यांनी तालुका कृषी कार्यालयात ठिय्या दिला. दरम्यान आंदोलनाची दखल घेत तालुका कृषी अधिकारी यांनी मौजे दहिगाव येथे तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीची पाहणी केली असून त्याबाबतचा कृषिशास्त्रज्ञ यांचा अहवाल येणे अद्याप बाकी आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार असल्याचे तालुका कृषी अधिकारी यांनी आंदोलन कर्त्यांना दिलेल्या पत्रात नमूद आहे. या आंदोलनात शेतकरी योगेश अवताडे, शिवा महल्ले, करण भारसाकडे, राहुल महल्ले, शशिकांत बोरसे, विशाल महल्ले, हर्षल अवताडे, बंटी काकड, मिलिंद सरदार, देवेश भारसाकडे, ओम खारोडे, प्रशांत खोट्टे आदी उपस्थित होते.

## वस्तीतील नालीला नागरिकांचा विरोध



**हिवरखेड :** येथील स्थानिक प्रभाग क्रमांक ३ मधील इस्लामपुऱ्यातील लक्ष्मीबाई राजाराम बोडखे प्लॉटमध्ये अवैध प्रकारे तयार करण्यात आलेल्या नालीमुळे नालीतील सांडपाणी रस्त्यावर येत असल्याने तेथील रहिवाश्यांना नाहकच त्रास सहन करावा लागत आहे. या बाबत या वस्तीतील रहिवाशांनी थेट नगरपरिषदला लेखी स्वरूपाचे निवेदन देऊन मागणी केली, व आठ दिवसात या वस्तीतील ही समस्या सोडली नाही.

# समस्याग्रस्त घरकुल परिसराची नगराध्यक्षांकडून पाहणी

प्रतिनिधी १२ जुलै



**मूर्तिजापूर :** समस्या ग्रस्त घरकुल परिसराची नगराध्यक्ष हर्षल साबळे यांनी संपूर्ण पाहानी केली आहेत. पावसाळ्याला सुरुवात होताच मूर्तिजापूर शहरातील प्रभाग क्रमांक ५ मधील घरकुल परिसरात गंभीर स्वच्छतेचा प्रश्न निर्माण झाला असून सांडपाण्याची पाइपलाइन तुंबल्याने तसेच काही ठिकाणी सेप्टिक टाक्या फुटल्यामुळे घाण पाणी थेट नागरिकांच्या घरात शिरत असून रहिवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

गरीब व गरजू नागरिकांसाठी शासनाने काही वर्षांपूर्वी घरकुलांची उभारणी केली. मात्र, परिसरातील सांडपाणी व्यवस्थेची योग्य देखभाल होत नसल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. रहिवाशांनी अनेक वेळा मूर्तिजापूर नगर परिषदेकडे तक्रारी करूनही अद्याप ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला पावसामुळे परिस्थिती अधिकच बिकट झाली असून घरांमध्ये घाण पाणी साचल्याने दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व महिलांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याने सामाजिक कार्यकर्ता शेख इम्रान शेख खलील व निजाम इंजिनियर यांनी खंत व्यक्त केली होती

घरकुल परिसरातील सांडपाणी तातडीने काढून स्वच्छता मोहीम राबवावी, तुंबलेली पाइपलाइन दुरुस्त करावी व सांडपाण्याचा कायमस्वरूपी निचरा करण्याची व्यवस्था करावी, करण्याची मागणी रेटून धरली होती यासंदर्भात मूर्तिजापूर नगराध्यक्ष हर्षल साबळे यांनी या भागातील नागरिकांची समस्या जाणून घेऊन तातडीने समस्या निकाल काढण्याची संबंधित विभागाला आदेश दिले ज्या ज्या ठिकाणी पाणी साचलेला सांडपाणी कचरा घाण त्वरित स्वच्छ करण्याचे आदेश दिले नगराध्यक्ष हर्षल साबळे यांच्याशी सद्दाम पटेल यांनी घरकुल मधील असलेली घाण सांडपाणी संदर्भात त्वरित उपाययोजना करावी अशी मागणी केली.

# शिवाजी इंजिनिअरिंग महाविद्यालयात निघाला नाग!

## सर्पमित्रांनी नागाला शिताफीने पकडले

प्रतिनिधी १२ जुलै



**अकोला :** शहरानजिकच्या बाभूळगाव येथील श्री शिवाजी इंजिनिअरिंग महाविद्यालयात शुक्रवार, 10 जुलै रोजी अचानक नागराजाचे दर्शन विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांना झाले. यामुळे सर्वत्र भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. तत्काळ सर्पमित्र बाळ काळणे यांना पाचारण करण्यात आले. त्यांनी व त्यांच्या टीमने शिताफीने विषारी नाग जातीच्या सापाला पकडून जंगलात सोडून देत सर्वांनाच भयमुक्त केले.

दरम्यान, शुक्रवारी सकाळी विषारी नागाने महाविद्यालयात प्रवेश केला. विषारी नाग दिसताच महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी वर्गात एकच गोंधळ उडाला. याबद्दल महाविद्यालयातून साप निघाल्याची माहिती तत्काळ सर्पमित्र बाळ काळणे यांना फोनवरून देण्यात आली. माहिती मिळताच घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन व विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी बाळ काळणे यांनी क्षणाचाही विलंब न लावता महाविद्यालयात दाखल झाले. सापला पाहताच हा साप नेमका कोणत्या जातीचा आहे, याची कल्पना त्यांना आली. तो जहाल विषारी सापांपैकी एक होता. त्यामुळे त्याला मोठ्या शिताफीने पकडून एका बरणीत टाकण्यात आले. यावेळी सर्वांनीच सुटकेचा निःश्वास सोडला.

# डॉ. अमित कावरे यांची डीपीसी वर सलग दुसऱ्यांदा नियुक्ती

प्रतिनिधी १२ जुलै



**मूर्तिजापूर :** तालुक्यातील एक अभ्यासू व विकासात्मक दृष्टी असणारे नेतृत्व म्हणून ज्यांची ओळख आहे असे डॉ. अमित रामदासजी कावरे यांची शासनाकडून जिल्हा नियोजन समिती सदस्य म्हणून सलग दुसऱ्यांदा नियुक्ती करण्यात आली आहे.

मागील काळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री असताना तसेच तत्कालीन महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री असताना डॉ. अमित कावरे यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली होती. त्या काळात आपल्या अभ्यासपूर्ण कृतीतून अनेक चर्चांमध्ये त्यांनी सहभाग नोंदविला तसेच शासनाकडून जिल्ह्याच्या नियोजनासाठी मिळणारा निधीचा दुरुपयोग होऊ नये म्हणून जिल्हा परिषद अंतर्गत असणाऱ्या दलित वस्ती विकास योजना, आरोग्य विभागाच्या कामांच्या प्रशासकीय मान्यता याच्यातील अनियमित्ता त्यांनी तक्रारीद्वारे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर त्या विषयात कारवाई सुद्धा पालकमंत्री आकाश फुंडकर यांनी केली तेच विषय नंतर विधिमंडळात महाराष्ट्राचे भारतीय जनता पार्टीचे मुख्य प्रतोद आमदार रणधीर सावरकर यांच्या अभ्यासपूर्ण शैलीत विधानसभेमध्ये मांडण्यात आले व त्यानंतर त्याची विभागीय चौकशी सुद्धा लागली. मूर्तिजापूर तालुक्याच्या ग्रामीण भागासाठी अनेक विकास कामे सुद्धा त्यांनी जिल्हा नियोजन समिती मार्फत खेचून आणली आक्रमकपणे ग्रामीण भागातील समस्याची मांडणी करणारे तसेच त्यांना ग्रामीण भागाकरिताअसलेला विकास कामाचा ध्यास पाहता त्यांची सलग दुसऱ्यांदा समिती सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी या नियुक्तीचे श्रेय पालकमंत्री आकाश फुंडकर, भारतीय जनता पार्टीचे विधान सभेतील मुख्य प्रतोद माननीय आमदार रणधीर भाऊ सावरकर तसेच खासदार अनुप धोत्रे यांना दिले आहे.

## जिल्ह्यात मतदार यादी विशेष गहन पुनरीक्षण कार्यक्रम सुरु

**अकोला :** मतदार यादी विशेष पुनरीक्षण मोहिमेच्या पार्श्वभूमीवर, सर्व मतदारांनी घरी येणाऱ्या बीएलओ यांना सहकार्य करत आपले फॉर्म भरून द्यावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले आहे. सध्या जिल्ह्यात मतदार यादी विशेष गहन पुनरीक्षण म्हणजेच 'एसआयआर' चे काम सुरू आहे. यामध्ये मतदारांची नोंदणी करणे, नावातील चुका दुरुस्त करणे, नवीन मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे आणि लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येक मतदाराचा सहभाग आवश्यक आहे. या कार्यक्रमानुसार, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी म्हणजेच बीएलओ ३० जूनपासून घरोघरी जात आहेत. आतापर्यंत शहरात ८०% फॉर्मचे वाटप पूर्ण झाले आहे. त्यामुळे सर्व मतदारांनी आपले फॉर्म योग्य पद्धतीने भरून आपल्या बीएलओकडे जमा करावेत.

# पोर्टवरील जन्म मृत्यू दाखल्या मधील अडचण दूर करा

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे इमरान खान यांची मागणी

प्रतिनिधी १२ जुलै

**आलेगाव :** विद्यार्थी शालेय प्रवेश तथा शालेय प्रमाणपत्रा करिता तसेच आधार व मतदान कार्ड अद्यावत करणे करीता जन्म दाखला अनिवार्य केला असल्यामुळे,विद्यार्थी व नागरिकांना जन्म दाखल्याची नितांत गरज आहे. परंतु सद्या स्थितीत सी आर एस पोर्टलवर नवीन नियमानुसार ग्राम पंचायत रजिस्टरवर जन्म मृत्यूची नोंद असल्यावर सुद्धा जुने हस्तलिखित प्रमाणपत्र अपलोड करावे लागते.तेंव्हा जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय मार्फत सदर प्रमाण पत्रास मान्यता दिली जाते,तरी मेहरबान महोदय नागरिकांकडे जुने हस्तलिखित प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यामुळे,ग्राम पंचायतला नोंद असून सुध्दा जन्म मृत्यू दाखला प्रमाणपत्रा पासून वंचित रहावे लागत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शालेय नुकसान होत आहे.तसेच नागरिकांना मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. तरी मेहेरबान महोदय ग्राम पंचायत रजिस्टर नुसार प्रमाणपत्र देण्यात यावे. व जुने प्रमाण पत्राची अट रद्द करण्यात यावी अथवा त्यावर योग्य पर्याय उपलब्ध करून द्यावा जेणे करून विद्यार्थी व नागरिकांना सोईचे होईल.या आशयाचे निवेदन पातूर पंचायत समितीचे माजी उपसभापती इमरान खान मुमताज खान यांनी मुख्यकार्यपालन अधिकारी अकोला यांना देऊन मागणी केली. निवेदनावर प्रतिलिपी म्हणून महाराष्ट्र राज्य मुखमंत्री,जिल्हाधिकारी,आणि जिल्हा आरोग्य अधिकारी नमूद आहे.

# खराब सोयाबीन बियाण्यामुळे नुकसानीस जबाबदार कंपन्यांवर गुन्हे दाखल करा

प्रतिनिधी १२ जुलै



**मुर्तिजापूर :** तालुक्यातील शेतक-यांनी सोयाबीनची पेरणी केली. परंतु पेरणीला 8-10 दिवस उलटूनही पिके उगवलीच नाहीत. तालुक्यात अनेक गावात एकही दाणा उगवला नसल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.

यामुळे शेतकऱ्यांवर पुन्हा दुबार पेरणीचे आर्थिक संकट कोसळले आहे. शेतकऱ्यांनी विश्वासाने खरेदी केलेले निकृष्ट/बोगस सोयाबीन बियाणेच उगवले नाही, याला संपूर्णपणे जबाबदार संबंधित बियाणे कंपन्या आहेत.सदर कंपनीवर गुन्हा दाखल करून शेतकऱ्यांना हेक्टरी पन्नास हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी केली.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष मूर्तिजापूरच्या वतीने गजानन पाटील चौधरी, तालुका प्रमुख, विनायकराव गुल्हाने, अरविंद तायडे, अमोल तांबडे, शेतकरी संघटनेचे नेते सुरेश जोगळे यांच्या नेतृत्वाखाली उपविभागीय अधिकारी साहेब यांना निवेदन देण्यात आले निवेदन देते वेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे छबीले पाटील, बंडू पाटील लांडे, बाळासाहेब खांडेकर, विकास लकडे, विलास देशमुख,अमर ठाकरे,संतोष रुद्रकार, सचिन तांबडे,पुजाजी सोनोने,बाळासाहेब सरोदे, गोलू खान, अण्णा सोनोने, रमेश ठोबरे,झहीर चाऊस व मूर्तिजापूर तालुक्यातील शेतकरी उपस्थित होते.

# देऊळगाव व अकोलखेड ग्रामपंचायतींना धक्का अतिक्रमण प्रकरणी दोन सरपंचांचे पद गेले

वि. प्रतिनिधी १२ जुलै

**अकोट :** अकोट तालुक्यातील देऊळगाव आणि अकोलखेड ग्रामपंचायतींच्या सरपंचांना शासकीय जागेवर अतिक्रमण केल्याप्रकरणी अपात्र घोषित करण्यात आले आहे. अकोला जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी यासंदर्भातील आदेश जारी केल्याने तालुक्यात राजकीय व प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

माहितीनुसार, देऊळगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच पूजा सागर गहले तसेच अकोलखेड ग्रामपंचायतीचे सरपंच दिगंबर संपतराव पिंप्राळे यांच्याविरोधात संबंधित ग्रामपंचायतीतील तक्रारदारांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे अपात्रतेसाठी अर्ज दाखल केले होते. या अर्जांमध्ये शासकीय जागेवरील अतिक्रमणाचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता.

तक्रारींची दखल घेत जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रकरणाची सुनावणी सुरू केली. दोन्ही बाजूंची मते, उपलब्ध कागदपत्रे आणि संबंधित बाबींचा सखोल विचार केल्यानंतर जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी अंतिम निर्णय दिला. त्यानुसार, पूजा सागर गहले आणि दिगंबर संपतराव पिंप्राळे यांना सरपंचपदासाठी अपात्र ठरविण्यात आले आहे.

या निर्णयामुळे दोन्ही ग्रामपंचायतींमध्ये नव्या राजकीय घडामोडींना वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच ग्रामपंचायत प्रशासनाच्या पुढील कार्यवाहीकडेही नागरिकांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, जिल्हाधिकाऱ्यांच्या या आदेशानंतर संबंधित ग्रामपंचायतींमध्ये सरपंचपद रिक्त होणार असून पुढील प्रशासकीय प्रक्रिया नियमांनुसार राबविण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. ग्रामपंचायतमधील पदाधिकारी यांनी नियमांचे पालन करणे आवशयक आहे. तसे नाही केले तर कारवाई होउ शकते.

## दे... धक्का.. एसटी बसेसचे वास्तव



**हातरूण :** एसटी बसेसची खस्ता हालत झाली आहे. त्याचा शहरी तसेच ग्रामीण भागातील प्रवाशांना त्रास होत आहे. येथील बसस्थानकात एक बस बंद पडली. त्यामुळे प्रवाशांना धक्का द्यावा लागला. बसेसची हालत चांगली नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे. आगारात किमान चांगल्या बसेस उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी केली जात आहे.

Dharti Janseva Pratishthan's

**Dharti College of Veterinary Science and Animal Husbandary**

(B. V. Sc. & A. H.)

Patur, Tq. Patur, Dist. Akola

Contact No.: 9169100900 Email Id: djppatur2002@gmail.com

**APPOINTMENTS**

APPLICATIONS ARE INVITED FOR THE TEACHING POSITIONS FOR PROPOSED COLLEGE OF VETERINARY SCIENCE AND ANIMAL HUSBANDARY

| Sr. No. | Name of the Department | Name of the Post for Veterinary Science and Animal Husbandary | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Associate Dean | Professor | Associate Professor | Assistant Professor |
| 1 | Veterinary Clinical Complex (Specialization in Surgery/ Medicine/Gynecology) | – | 1 | – | – |
| 2 | Veterinary Physiology and Biochemistry | – | 1 | 1 | 3 |
| 3 | Livestock Production and management | – | – | – | – |
| 4 | Livestock Farm Complex | – | – | – | 2 |
| 5 | Livestock Clinical Complex (Veterinary Surgery) | – | – | – | 1 |

Qualification as per VCI/ MAFSU, Nagpur

*01 Post each in Animal Nutrition, Livestock Production Management, Poultry Science, Veterinary Medicine, Veterinary Gynecology, Animal Genetics and Breeding

*01 Post is in Veterinary Surgery, Veterinary Biochemistry, Veterinary Obstetrics and Gynecology, Veterinary Pathology and 02 Posts in Veterinary Medicine

Secretary

Secretary
Dharti Janseva Pratishthan

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. १२ जुलै २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# जिल्हाधिकारी मीना यांच्याकडून एसआयआरच्या कामाचा आढावा

प्रतिनिधी १२ जुलै




**यवतमाळ** : जिल्ह्यात सध्या मतदान यादीचे विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रम सुरु आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी विकास मीना यांनी पुसद, आर्णी तालुक्यातील लोणबेहळ, महागाव तालुक्यातील गुंज, शिरपूर तसेच यवतमाळ मधील प्रभाग २६ गणेश नगर येथील गजानन महाराज मंदिर येथे भेट दिली. या ठिकाणी सुरु असलेल्या मतदान यादीचे विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कामाचा आढावा त्यांनी घेतला.

या दरम्यान महागाव येथे मतदान केंद्रस्तरिय अधिकारी यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाला भेट देवून मार्गदर्शन केले.

या भेटीवेळी जिल्हाधिकारी विकास मीना यांनी मतदान यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणची कामे गांभीर्याने पूर्ण करण्याच्या सूचना मतदान केंद्रस्तरिय अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी नगराध्यक्ष प्रियदर्शनी उईके, यवतमाळचे उपविभागीय अधिकारी गोपाळ देशपांडे, नगरसेवक, बीएलओ, बुथ प्रमुख, पदाधिकारी उपस्थित होते.

## खड्डे बुजवून रस्ता चिखलमुक्त

प्रतिनिधी १२ जुलै

**आर्णी** : प्रभाग क्रमांक १ मधील देऊरवाडी पु. आणि राधाकृष्ण नगरी परिसरात पावसामुळे रस्त्यावर चिखल व मोठे खड्डे निर्माण झाल्याने नागरिकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. ही समस्या लक्षात घेऊन नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा सभापती तथा नगरसेविका सौ. छबुताई मनोज चारोडे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे पती व शिवसेना उपशहरप्रमुख मनोजभाऊ चारोडे यांनी तातडीने पुढाकार घेत रस्त्यांची दुरुस्ती करून घेतली. शनिवार (दि. ११ जुलै) रोजी मनोजभाऊ चारोडे यांनी स्वतः घटनास्थळी उपस्थित राहून रस्त्यावरील खड्डे बुजविणे तसेच चिखलमुक्त करण्याचे काम पूर्ण करून घेतले. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षिततेला व दैनंदिन वाहतुकीला प्राधान्य देत ही कार्यवाही तातडीने करण्यात आली.

स्थानिक नागरिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष कृतीतून काम करण्याची भूमिका मनोजभाऊ चारोडे यांनी पुन्हा अधोरेखित केल्याची भावना परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली.

या त्वरित कार्यवाहीमुळे देऊरवाडी पु. व राधाकृष्ण नगरीतील नागरिकांनी समाधान व्यक्त करत सौ. छबुताई चारोडे आणि मनोजभाऊ चारोडे यांचे आभार मानले.

# मोकाट जनावरांमुळे यवतमाळकरांच्या जीवाला धोका



प्रतिनिधी १२ जुलै

**यवतमाळ** : यवतमाळ शहरातील प्रमुख रस्ते, चौक आणि सार्वजनिक ठिकाणी मोकाट जनावरांचा वाढता वावर नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी गंभीर समस्या बनत असून, नगर परिषद प्रशासनाने तातडीने विशेष मोहीम राबवून या जनावरांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी भाजप शेतकरी नेते देवानंद पवार यांनी केली आहे.

शहरातील वर्दळीच्या भागात सांड, गायी व इतर जनावरे भररस्त्यात एकमेकांशी झुंज देत असल्याने वाहनचालक, पादचारी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि शालेय विद्यार्थ्यांच्या जीविताला धोका निर्माण होत आहे. त्यामुळे वाहतूक विस्कळीत होण्याबरोबरच मोठ्या अपघाताची शक्यता वाढली आहे. शाळा सुरू झाल्याने हजारो विद्यार्थी दररोज या मार्गांवरून प्रवास करीत असल्याने प्रशासनाने कोणतीही दुर्घटना घडण्यापूर्वीच ठोस उपाययोजना कराव्यात, असे पवार यांनी म्हटले आहे.

मोकाट जनावरांना पुरेसा चारा न मिळाल्याने ती कचऱ्यातील प्लास्टिकच्या पिशव्या, पॉलिथीन आणि इतर घातक वस्तू खात असल्याने त्यांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. त्यामुळे हा प्रश्न केवळ नागरिकांच्या सुरक्षेपुरता मर्यादित नसून पशुकल्याणाशीही संबंधित असल्याचे त्यांनी सांगितले.

देवानंद पवार यांनी भाजप नेते मदन येरावार यांच्यामार्फत यवतमाळ नगर परिषदेच्या नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शनी उईके यांना या प्रश्नात लक्ष घालून तातडीने प्रभावी कारवाई करण्याची विनंती केली आहे.

### तातडीने कारवाईची मागणी

**गोशाळेत हलविण्याची सूचना**

- मोकाट जनावरांना सुरक्षितरीत्या पकडून गोशाळा किंवा शासनमान्य निवारा केंद्रात हलवावे. त्यामुळे शहरातील अपघातांचा धोका कमी होईल आणि जनावरांना योग्य चारा, पाणी, निवारा तसेच वैद्यकीय सुविधा उपलब्ध होऊन त्यांच्या आरोग्याचेही संरक्षण होईल, अशी अपेक्षा देवानंद पवार यांनी व्यक्त केली.

## पुसद मतदारसंघात रविवारी 'एसआयआर' विशेष कॅम्प

### मतदारांना गणना पत्रक भरून देण्याचे आवाहन

प्रतिनिधी १२ जुलै

**यवतमाळ** : पुसद विधानसभा मतदारसंघात मतदान यादीच्या सखोल विशेष पुनरिक्षण (एसआयआर) कार्यक्रमांतर्गत रविवार, दि. १२ जुलै २०२६ रोजी सर्व मतदान केंद्रांवर विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. या कॅम्पमध्ये मतदारांनी उपस्थित राहून गणना पत्रक भरून द्यावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी, पुसद विधानसभा मतदारसंघ यांनी केले आहे.

मतदार यादी अद्ययावत व अचूक ठेवण्यासाठी नागरिकांचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे पुसद विधानसभा मतदारसंघातील सर्व पात्र मतदारांनी या विशेष कॅम्पचा लाभ घ्यावा व बीएलओ यांना सहकार्य करून गणना पत्रक वेळेत सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

- या विशेष कॅम्पमध्ये सहभागी होताना प्रत्येक मतदाराने आपले मतदार ओळखपत्र, आधार कार्डची प्रत तसेच रंगीत पासपोर्ट आकाराचे छायाचित्र सोबत आणावे. मतदान केंद्रावरील मतदान केंद्रस्तरिय अधिकारी (बीएलओ) यांच्याकडून गणना पत्रक प्राप्त करून ते तात्काळ अचूक माहितीने भरून बीएलओ यांच्याकडे जमा करावे.

# एकही पात्र मतदार वंचित राहू नये

### विडूळ येथे एसडीओ सखाराम मुळे यांनी घेतला आढावा

प्रतिनिधी १२ जुलै



**उमरखेड** : विशेष सघन मतदारयादी पुनरीक्षण (एसआयआर) अभियानांतर्गत सुरू असलेल्या कामाचा आढावा घेण्यासाठी उपविभागीय अधिकारी (एसडीओ) सखाराम मुळे यांनी विडूळ येथे भेट देऊन बीएलओ व सहाय्यक बीएलओ यांची बैठक घेतली. मतदारयादीतील प्रत्येक नोंद अचूक राहील आणि एकही पात्र मतदार यादीपासून वंचित राहणार नाही, यासाठी घरभेटी प्रभावीपणे पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

मतदार पडताळणी, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, प्रलंबित प्रकरणे तसेच प्रत्यक्ष कामातील अडचणींचा बैठकीत सविस्तर आढावा घेण्यात आला. शासनाने निश्चित केलेल्या मुदतीत सर्व प्रलंबित कामे गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परस्पर समन्वयाने काम करावे, असेही मुळे यांनी सांगितले.

मतदार पडताळणीची प्रक्रिया अधिक प्रभावी करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करण्यावर बैठकीत भर देण्यात आला.

यावेळी नायब तहसीलदार अशोक करवते, मंडळ अधिकारी प्रियंका क्षीरसागर, आरोग्य अधिकारी डॉ. जयराम बंशी, पोलिस पाटील गजानन मुलंगे, बीएलओ बाळासाहेब सरसमकर, सुनील पवार, शरद थोरकर, मनीषा बैनवाड, संतोष माहुरे, नागेश मिराशे, संभाजी पुंडे तसेच अंगणवाडी सेविका यास्मिन पठाण, आरती रणमले, माया धुळे, शिला धुळे, प्रतिभा ठमके आणि संबंधित अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. बैठकीच्या शेवटी एसडीओ मुळे यांनी उपस्थितांच्या शंकांचे निरसन करून आवश्यक मार्गदर्शन केले.

## विद्यार्थी अपघातात जखमी, युवा सेनेची सुरक्षेची मागणी

प्रतिनिधी १२ जुलै

**नेर** : येथील श्री शिवाजी हायस्कूलसमोर विद्यार्थ्याला भरधाव दुचाकीने धडक दिल्याची घटना घडली. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, या प्रकरणी युवा सेनेतर्फे शाळा प्रशासन व नेर पोलिसांना निवेदन देण्यात आले.

श्री शिवाजी हायस्कूलमध्ये इयत्ता दुसरीत शिक्षण घेणारा अर्पित अविनाश तूपट हा विद्यार्थी शाळा सुटल्यानंतर मुख्य प्रवेशद्वारातून बाहेर पडत असताना भरधाव दुचाकीने त्याला धडक दिली. या अपघातात विद्यार्थी सुदैवाने किरकोळ जखमी झाला. या घटनेची सखोल चौकशी करून संबंधित वाहन चालकावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. तसेच शाळा सुटण्याच्या वेळेत हायस्कूल परिसरात पोलिस बंदोबस्त किंवा वाहतूक नियंत्रणाची व्यवस्था करावी, अशी मागणी केली. मुख्य प्रवेशद्वाराजवळ जबाबदार शिक्षक, कर्मचारी किंवा सुरक्षा रक्षक नियुक्त करून विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे रस्ता ओलांडण्यासाठी मदत करावी, असे निवेदनात म्हटले आहे.

यावेळी पालिकेच्या शिक्षण सभापती तथा युवा सेनाप्रमुख ॲड. सुनंदा चव्हाण, नगरसेवक गौरव नाईकर, माजी शहरप्रमुख दीपक आडे, युवा सेना शहरप्रमुख मयूर काळे, उपशहरप्रमुख सुनील भबुतकर, रितेश गुल्हाने, कुणाल भोयर, रोहन नागपुरे, प्रेम दुधे, मंथन देशमुख, नितेश राठोड, पंकज खानजोडे, संजय राठोड आदी उपस्थित होते.

## वाघ-मानव संघर्ष रोखण्यासाठी पथनाट्याद्वारे जनजागृती

प्रतिनिधी १२ जुलै

**पांढरकवडा** : वन्यप्राणी व मानव संघर्ष कमी करण्यासाठी आणि वाघ संवर्धनाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने पांढरकवडा वनविभाग, Management of Tiger Outside Tiger Reserves तसेच स्वर जीवन सांस्कृतिक कला व बहुउद्देशीय संस्था, घाटंजी यांच्या संयुक्त विद्यमाने विविध गावांमध्ये पथनाट्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या अभियानांतर्गत वणी वनपरिक्षेत्रातील सिंदोला, शिरपूर, कुबारखाणी, मारेगाव वनपरिक्षेत्रातील लोणी, तेजणी, विहीरगाव, पारवा वनपरिक्षेत्रातील माणुसधरी, कुर्ली, पारवा, मुकुटबन वनपरिक्षेत्रातील जुनोनी, पवणार, सावळी, जामणी वनपरिक्षेत्रातील कारेगाव, मोच्छी, शेखापूर तसेच पांढरकवडा वनपरिक्षेत्रातील वेडद, मोहदरी, वंजारी या गावांमध्ये जनजागृतीपर पथनाट्य सादर करण्यात आले.

पथनाट्याच्या माध्यमातून वन्यजीव संरक्षणाचे महत्त्व, जंगलातील वाघ व बिबट्यांची पर्यावरणीय भूमिका तसेच वन्यप्राणी-मानव संघर्ष टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी याविषयी प्रभावी संदेश देण्यात आला. कलावंतांनी आपल्या अभिनयातून ग्रामस्थांना वन्यजीव संवर्धनाची गरज पटवून देण्याचा प्रयत्न केला.

हा उपक्रम उपवनसंरक्षक, पांढरकवडा श्री. यशवंत बहाळे (भा. व. से.) यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. सिंदोला येथे झालेल्या कार्यक्रमाला अजिंक्य यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच संबंधित वनपरिक्षेत्र कार्यालयांचे अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी स्वर जीवन संस्थेचे अध्यक्ष प्रफुल राऊत यांनी वन्यप्राणी व मानव संघर्षाची कारणे, त्यावरील उपाययोजना आणि वन्यजीव संवर्धनाचे महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

स्वर जीवन संस्थेच्या कला पथकातील भूपेंद्र राऊत, नरेश कुंटलवार, राजू कुंटलवार, पिंटू मेश्राम, रविना मानकर, कु. स्नेहल लोहकरे आणि अमोल जाधव यांनी पथनाट्य सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.

# दिग्रस येथे भवानी टेकडीवरील साहसी उद्यानाची दुरवस्था

### सुविधा ठप्प, नागरिकांत नाराजी ; खेळ साहित्य तुटलेल्या अवस्थेत

प्रतिनिधी १२ जुलै






**संदीप रत्नपारखी**

**दिग्रस** : दिग्रस शहरातील भवानी टेकडीवरील साहसी खेळ उद्यानाची देखभाल होत नसल्याने उद्यानाची अवस्था दिवसेंदिवस दयनीय होत असल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे. तुटलेले खेळ साहित्य, बंद पडलेले साहसी खेळ, अस्वच्छ परिसर आणि अपुऱ्या देखभालीमुळे पर्यटकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, उद्यानात प्रवेशासाठी प्रति व्यक्ती २० रुपये शुल्क आकारले जात असले, तरी त्यानुसार अपेक्षित सुविधा मिळत नाहीत. मुलांसाठी उभारण्यात आलेले झोके, घसरगुंडी आणि अन्य खेळ साहित्य अनेक ठिकाणी तुटलेल्या अवस्थेत असून काही साहसी खेळही दीर्घकाळापासून बंद आहेत. त्यामुळे उद्यानात येणाऱ्या पर्यटकांची निराशा होत असल्याचे सांगितले जात आहे. लहान मुलांसाठी असलेल्या खेळ साहित्याचा वापर मोठ्या व्यक्तींमार्फत होत असल्याचेही निदर्शनास येत असून, त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभावी यंत्रणा नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. परिणामी, आधीच खराब झालेल्या साहित्याचे अधिक नुकसान होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. उद्यान परिसरात प्लास्टिक कचरा, वाढलेले गवत आणि झुडपे यामुळे अस्वच्छतेचे चित्र दिसत आहे. नियमित स्वच्छता आणि देखभालीचा अभाव असल्याने वन विभागाच्या कार्यपद्धतीबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. यवतममाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या पुढाकारातून भवानी टेकडीच्या सौंदर्यीकरणासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला होता. मात्र, संबंधित यंत्रणेच्या दुर्लक्षामुळे उद्यानाची अवस्था जीर्ण झाली आहे. प्रवेश शुल्कातून महसूल मिळत असताना सुविधा आणि देखभाल का होत नाही, असा सवालही नागरिकांनी उपस्थित केला आहे. भवानी टेकडी हे दिग्रसमधील प्रमुख पर्यटनस्थळ असल्याने मंत्री संजय राठोड यांनी स्वतः पाहणी करून बंद पडलेले साहसी खेळ तातडीने सुरू करावेत, तुटलेले साहित्य बदलावे, स्वच्छता आणि देखभाल नियमित करावी तसेच संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामकाजाची चौकशी करून आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# महाराष्ट्र साई पद्मश्री पुरस्कार मिळाल्याबद्दल ह.भ.प. विनायकराव महाराज यांचा सत्कार

प्रतिनिधी १२ जुलै




**उमरखेड** : वारकरी सांप्रदायाच्या जिल्हाध्यक्ष पदी तसेच महाराष्ट्र साई पद्मश्री पुरस्काराने सन्मानित झाल्याबद्दल तालुक्यातील चातारी गावाचे रहिवाशी विनायकराव माने महाराज यांचा येथील नाथनगर श्रीसंत गजानन महाराज संस्थानच्या वतीने नुकताच सत्कार करण्यात आला आहे.

या सत्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त प्राचार्य वि.ना कदम हे होते तर ज्येष्ठ नागरिक जेठमल बंग, श्याम तेला, दळवी, जाधव तसेच हरीपाठ महिला मंडळ यांची प्रमुख उपस्थिती होती. संस्थानचे उपाध्यक्ष गंगाधर साखरे यांच्या हस्ते हभप विनायकराव महाराज त्यांच्या पत्नी सिंधुताई यांचा शाल श्रीफळ देऊन

सत्कार करण्यात आला. उमरखेड तालुक्यातील चातारी येथील रहिवाशी विनायकराव माने महाराज यांनी यवतमाळ जिल्ह्यात वारकरी सांप्रदायाची चळवळ गावागावात पोहचविण्यासाठी जोमाने कार्य करित असल्याची दखल घेऊन वारकरी सांप्रदाय कमेटीच्या जिल्हाध्यक्षपदी निवड झाली तसेच शिर्डी संस्थानच्या वतिने त्यांचा महाराष्ट्र साई पद्मश्री पुरस्काराने सन्मानित झाल्याबद्दल त्यांचा उमरखेड येथील श्रीसंत गजानन महाराज संस्थानच्या वतीने दि. २ जुलै रोजी सन्मानित करण्यात आले कार्यक्रमाचे संचालन यशवंतराव गीरी यांनी तर आभार अजय गोविंदवार यांनी मानले.

# मतदार यादी विशेष पुनरिक्षण अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

### नवमतदार नोंदणीसह अर्ज भरण्याचे काम उत्साहात; नागरिकांना सक्रिय सहभागाचे आवाहन

प्रतिनिधी १२ जुलै



**घाटंजी** : भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षण (SIR) अभियानांतर्गत उंदरणी येथे पात्र मतदारांचे अर्ज भरण्याचे काम उत्साहात पार पडले. मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या या अभियानाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

या अभियानात BLO सुदाम राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पात्र मतदारांचे अर्ज भरून घेण्यात आले. तसेच नवमतदार नोंदणी, मतदार यादीतील माहितीतील दुरुस्ती आणि आवश्यक बदलांची प्रक्रिया राबविण्यात आली. मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभाग नोंदवत आपल्या मतदार नोंदणीची खात्री केली.

यावेळी ग्रामरोजगार सेवक फुलवंत बनसोडे तसेच माजी ग्रामपंचायत सदस्य अमोलभाऊ गावंडे यांनी प्रत्येक पात्र नागरिकाने आपल्या मतदार नोंदणीची खात्री करून लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले.

अभियानांतर्गत मतदार यादीतील नोंदींची सखोल पडताळणी, नवमतदारांची नोंदणी, माहितीतील दुरुस्ती आणि पारदर्शक व अचूक मतदार यादी तयार करण्यावर भर देण्यात येत आहे. लोकशाहीच्या बळकटीसाठी प्रत्येक पात्र मतदाराने या विशेष पुनरिक्षण अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती
रविवार, दि. १२ जुलै २०२६ Web. http://epaper.citynewssuperfast.com



# चोरीच्या दुचाकीसह दोन आरोपी ताब्यात

प्रतिनिधी १२ जुलै




**अमरावती :** चोरीच्या दुचाकीसह दोन आरोपी ताब्यात घेण्यात गुन्हे शाखेच्या पोलिसांना यश आले आहे.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी आयुक्तालय हददीतील दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकिस आणणेबाबत आदेशीत केल्यावरुन गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर यांचे नेतृत्वात पथकातील पोलिस अधिकारी व अंमलदार यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे

पोलीस स्टेशन गाडगे नगर अप. कं. ७३३/२०२६ कलम ३०५ (ब) भा. न्या. सं. अन्वये दुचाकी चोरी चा गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयाचा संमातर तपास गुन्हे शाखेचे पथक करीत असतांना आज दिनांक ११/०७/२०२६ रोजी गुन्हे शाखेच्या पथकास गोपनीय माहीती मिळाली की दोन इसम हे विदयाभारती कॉलेज समोर चोरीची गाडी घेवुन उभे आहे. मिळालेल्या माहीती वरूण नमुद ठिकाणी जाउन दोन इसमास ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातील सदर मोपेड मोटर सायकल बाबत विश्वासात घेउन बारकाइने विचारपुस केली असता त्यांनी ती मोपेड मोटर सायकल ही दि.०६.०७.२०२६ रोजी रात्री दरम्यान फिर्यादी यांचे राहत्या घरा समोरून चोरुन नेली होती असे त्यांनी सांगीतले वरुन त्याचे ताब्यातुन बजाज कंपनीची झुपिटर मोपेड मोटरसायकल जप्त करून पोलीस स्टेशन गाडगे नगर अप.कं. ७३३/२०२६ कलम ३०५ (ब) भा. न्या.सं. प्रमाणे दाखल असलेला मोटर सायकल चोरीचा गुन्हा उघडकिस आणला व पुढील कायदेशीर कार्यवाही करीता दोन्ही आरोपी यांना पोस्टे गाडगे नगर यांच्या ताब्यात देण्यात आले.

ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव श्रेयर पानदास रौराळे वय १९ वर्ष रा. लक्ष्मी नगर अमरावती , नयन गोपाल गोपाळे वय १९ वर्ष रा. कपिलवास्तु नगर, अमरावती ताब्यात घेतलेला मुद्देमाल एक बजाज कंपनीची झुपिटर मोपोड MH 27 DC 4979 नंबर ची जिवा चेसीस नं MD-626659M1L06827, इंजिन न CG5LM1801292 असा आहे.

असा एकुण ५०,००० रु मुददेमाल जप्त करण्यात आला.

सदर वी कारवाई मा. पोलीस आयुक्त राकेश ओला, शहर यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त परिमंडळ ०१ यशवंत सोळंके, पोलीस उपायुक्त परिमंडळ ०२ श्याम घुगे, पोलीस उपायुक्त मुख्यालय (गुन्हे) प्रांजली सोनवणे, सपोआ गुन्हे शाखा कैलास पुंडकर यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखाचे पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वात सपोनि. महेश इंगोले, पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार - सुनिल लासुरकर, गजानन ढेवले, आस्तिक देशमुख, दिपक सुंदरकर, मंगेश परिमल, मनोज ठोसर, सचिन बाहाळे, जहीर शेख, अतूल संभे, संजय भारसाकळे, नईम बेग, विकास गूड्धे, विशाल वाकपांजर, योगेश पवार, राजीक रायलीवाले, संदीप खंडारे, मारोती पांडे यांनी केली आहे.

# शहरात चालणाऱ्या ऑनलाइन जुगारावर धाड

## दीड लाखाचा मुद्देमाल केला जप्त



प्रतिनिधी १२ जुलै

**अमरावती:** शहरात चालणा-या ऑनलाइन चक्री जुगारावर धाड टाकून एकूण एक लाख सहासष्ट हजार सहाशे दहा रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई गुन्हे शाखा युनिट दोनच्या पथकाने केली.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या आदेशानुसार गुन्हे शाखा निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वात पथकाने कारवाई केली. १० जुले रोजी यशोदा नगरातील अरमान टेडर्स मध्ये फन टारगेट, गोल्डन चान्स या ऑनलाईन वेबसाईटवर अवैध असलेले चक्री ऑनलाईन खेळावर पैसे लावुन जुगार सुरू आहे अशी माहिती मिळाली. त्यानुसार गुन्हे शाखा पथकाने अरमान टेडर्स नावाच्या दुकानात रेड केली. दुकाना मध्ये टिव्ही स्क्रिनवर फनटार्गेट वेबसाईटवर अवैध ऑनलाईन गेम पैशाची देवाण घेवाण करून दोन इसम खेळ खेळवतांना व तीन इसम खेळ खेळताना दिसले. त्यांना ताब्यात घेवून त्यांच्या ताब्यातून रोख रक्कम, ऑन लाईन जुगार खेळाचे साहित्य, मोबाईल असा एकुण एक लाख सहासष्ट हजार सहाशे दहा रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी विरुध्द फेजरपुरा पोलिस स्टेशनमध्ये महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. अरमान संतोष पाल, संतोष रघुनाथ यशोदा नगर, अमरावती, सुमीत अवधुत खिराडे बेनोडा, यश पुरुषोत्तम लाडुकर रा. किरण नगर अमरावती, सतीश प्रकाश पोजगे रा. यावली शहीद ता. तिवसा जि. अमरावती अशी आरोपींची नावे आहेत..

# एसटी स्मार्ट कार्ड नोंदणी शिबिराला आ. सुलभा खोडके यांची भेट

प्रतिनिधी १२ जुलै



**अमरावती :** महिला व ज्येष्ठ नागरिकांना शासनाच्या हाफ तिकीट योजनेचा लाभ सहज आणि सुलभपणे मिळावा, या उद्देशाने अमरावती महानगर स्थित प्रभाग क्रमांक-२ गाडगे नागर मध्ये आयोजित करण्यात आलेल्या एसटी स्मार्ट कार्ड (NCMC) नोंदणी शिबिराला आमदार - सौ. सुलभाताई खोडके यांनी भेट देऊन शिबिराची पाहणी केली.

या शिबिराला महिला व ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अनेक पात्र लाभार्थ्यांनी शिबिरात प्रत्यक्ष उपस्थित राहून एसटी स्मार्ट कार्डासाठी नोंदणी केली. शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने हे शिबिर महत्त्वपूर्ण ठरले.

यावेळी आ. सौ. सुलभाताई खोडके यांनी नागरिकांशी संवाद साधत शासनाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक नोंदणी वेळेत पूर्ण करण्याचे आवाहन केले. तसेच, प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत शासनाच्या सुविधा पोहोचाव्यात यासाठी भविष्यातही अशा लोकाभिमुख उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येईल, अशी ग्वाही आ. सौ. सुलभाताई खोडके यांनी दिली.

यावेळी विधान परिषद आमदार संजय खोडके, प्रभागाचे नगरसेवक प्रमोद महल्ले , नगरसेविका- मिनल सवाई , योगेश सवाई आदींसह एसटी महामंडळातील अधिकारी व कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतलेल्या एसटी महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी, आयोजक तसेच मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिबिर यशस्वी करणाऱ्या सर्व नागरिकांचे सुद्धा आ. सुलभाताई खोडके यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

# स्वच्छता राखा – प्लास्टिकमुक्त परिसर घडवा

प्रतिनिधी १२ जुलै



**अमरावती :** आयुक्त तथा अतिरिक्त आयुक्त अमरावती महानगरपालिका यांच्या "संयुक्त विशेष मोहीम राबविणेबाबत" आदेशाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कारवाईचा अहवाल दिला.

मालवीय चौक, चित्रा चौक ते इतवारा बाजार रोड परिसरात 09/07/2026 राबविण्यात आली.

या मोहिमेदरम्यान प्रतिबंधित सिंगल यूज प्लास्टिकचा वापर, स्वच्छता, दोन डस्टबिनची उपलब्धता, अतिक्रमण तसेच इतर बाबींची सखोल तपासणी करण्यात आली.

कारवाईदरम्यान पुढीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात आली :

पवन फुटाणा – ₹1,000/- (दोन डस्टबिन उपलब्ध नसल्याबद्दल), सईद नवाब – ₹1,000/- (दोन डस्टबिन उपलब्ध नसल्याबद्दल), शेख मुजाहिब बागवान – ₹1,000/- (दोन डस्टबिन उपलब्ध नसल्याबद्दल), सलीम खान – ₹1,000/- (दोन डस्टबिन उपलब्ध नसल्याबद्दल), अमान खान – ₹1,000/- (दोन डस्टबिन उपलब्ध नसल्याबद्दल), हबीब खान – ₹500/- (स्वच्छता नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल)

एकूण दंड वसुली : ₹5,500/ वसूल करण्यात आला. मोहिमेदरम्यान उपस्थित अधिकारी व कर्मचारी :

प्लास्टिक नोडल अधिकारी ए. के. गोहर साहेब

- *ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक – राजू डीक्याव स
- प्लास्टिक स्वास्थ्य निरीक्षक – शसचिन सैनी
- स्वास्थ्य निरीक्षक एम. सैय्यद
- स्वास्थ्य निरीक्षक निखिल खंगाळे
- स्वास्थ्य निरीक्षक, मेघराज ढेंनवाल

बीटप्युन मयूर सारसर

अतिक्रमण प्रमुखकोल्हे साहेब व त्यांची संपूर्ण टीम स्वच्छ, सुंदर व प्लास्टिकमुक्त अमरावतीसाठी महानगरपालिकेची संयुक्त विशेष मोहीम प्रभावीपणे सुरू आहे.

# 12 जुलै आ. प्रविण पोटे पाटील यांचा सत्कार समारंभ निमित्त आमदार प्रवीण पोटे-पाटील : माणुसकीचे गौरीशंकर...



माजी पालक मंत्री व विद्यमान आमदार प्रवीणजी पोटे पाटील यांचा सर्वशाखीय माळी संघ ऋणानुबंध परिवाराच्या वतीने रविवार दि.१२ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता, अभियंता भवन येथे जाहीर सत्कार समारंभाचे आयोजन केले. त्या निमित्याने समाजभूषण प्रा. श्रीकृष्ण बनसोड यांचा लेख आमच्या वाचकांसाठी प्रकाशित करीत आहोत - संपादक महात्मा फुलेंनी ख्रिस्त-महंमद-मांग-ब्राम्हणांशी। धरावे पोटाशी बंधुपरी॥ ही मानवतेची शिकवण दिली. आजही काही व्यक्ति ह्या राजकीय पक्षाचे नेतृत्व करताना स्वहितापेक्षा उपेक्षित व वंचित समाजाच्या विकासासाठी झिजण्यात, त्यांच्या अंतरीचा दिवा सतत तेवत असतो. ते इतरांच्या आनंदात स्वतः आनंद शोधत असतात. अशा सामाजिक, शैक्षणिक व राजकीय व्यक्तिंमधील माजी मंत्री आणि विद्यमान आमदार श्री. प्रवीणजी पोटे-पाटील हे एक आहेत. त्यांचे पिताश्री रामचंद्रजी आणि मातोश्री सुर्यकांतादेवी पोटे हे उभयता आध्यात्मिक विचाराचे!.. कमालीचे कुटूंबवत्सल! त्यांच्या सुसंस्कारातून श्री. प्रवीणजी पोटे पाटील यांचे व्यक्तिमत्व आकारास आले. त्यांना विद्यार्थी जीवनापासूनच समाज कार्याची आवड होती. शिक्षणानंतर ते व्यवसायाकडे वळलेत. जिध्द –चिकाटी व सतत परिश्रमातून ते व्यवसायात यशस्वी ठरलेत! व्यवसायातून समाजसेवेला त्यांनी प्राधान्य दिले. अंध-अपंग-मूक बधीर आदि दिव्यांगांना शिक्षणासाठी, त्यांच्या अन्न-वस्त्र-निवारा ह्या मुलभूत गरजांच्या पुर्ततेसाठी भरभरून अर्थपूर्ण मदतीचा हात देतात.

आ. प्रवीणजी पोटे हे सन २०१५ मध्ये अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री होते. तत्पूर्वी आणि त्यानंतरही त्यांनी तळागाळातील सामान्यातील सामान्य माणसांसोबत जुळलेली आपुलकीची नाळ तुटू दिली नाही. उलट ती त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळे अधिक घट्ट झाली. त्यांनी महात्मा फुले व शिक्षणमहर्षी डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या विचारातून व शैक्षणिक कार्यापासून प्रेरणा घेवून पी.आर. पोटे एज्युकेशन इन्स्टिट्युट ह्या शिक्षण संस्थेची स्थापना केली. ग्रामीण भागातील मुलं-मुलीं शिकून साक्षर व्हावे. त्यांनी उद्योगी व स्वावलंबी व्हावे. या उदात्त ध्येयातून महाविद्यालय हे मंदिर व विद्यार्थ्यांना दैवत समजून विविध अभ्यासपुरक व अभ्यासेत्तर कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. आ. प्रवीणजी पोटे हे भविष्याचा वेध घेणारे व्यक्तिमत्व आहेत. वाचाल तरच वाचाल, ह्या दृष्टीकोनातून वाचन संस्कृती समृध्द झाली पाहिजे. म्हणून मातोश्री स्व. सुर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे यांचे नावाने उत्कृष्ट वाङ्मय निर्मिताला पुरस्कार प्रदान करतात. श्री. प्रवीणजी पोटे यांची आध्यात्मिक पिंड असल्यामुळे प्राचीन धार्मिक ग्रंथ आणि संत साहित्यामधून नैतिक मूल्यांची पेरणी केलेली आहे. त्यातील आध्यात्मिक विचार हे आदर्श व नितिमान जीवन जगण्यासाठी ऊर्जा देतात. विविध धार्मिक उत्सवाचे आयोजन करून संताचे मौलीक विचार धनाचा प्रवाह सतत वाहता ठेवण्याचे कार्य करतात. जे अनेकांना प्रेरणा देणार आहे.

प्रत्येक राजकीय पक्षाचे ध्येय-धोरण असते. विचारधारा असते. एका राजकीय पक्षातील नेत्याचे दुसऱ्या राजकीय पक्ष न नेल्यासोबत वैचारिक मतभेद असतात. आ.श्री. प्रवीणजी पोटे यांचीही विशिष्ट विचारधारा असली, तरी त्यांचे इतर राजकीय पक्ष नेत्यांसोबत वैचारिक मतभेद असु शकतात. त्यांचे इतर राजकीय पक्ष नेत्यांसोबत आपुलकीचे स्नेहपूर्ण संबंध आहेत. त्यांनी मतभेद आणि मनभेद यांना पूर्णपणे फाटा दिला. त्यांनी सर्वच जाती, धर्म व पंथातील व्यक्तिंसोबत ऋणानुबंध चे संबंध कायम-स्वरुपी टिकवून ठेवलेत!, म्हणूनच अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद निवडणूकीत विजयाची हॅट्रीक करु शकलेत.

आ.श्री. प्रवीणजी पोटे यांच्या व्यक्तिमत्वाचे एक वैशिष्ट्य म्हणजे ते कुठल्याही विषयाच्या संदर्भात कुणाशीही पक्षपात करणे, भेदभाव करणे हे त्यांच्या व्यक्तिमत्वात नाही. ते सदैव जाती-धर्मभेद विसरुन समतेचे मूल्य जपतात. पालकमंत्री असताना लोकांच्या प्रश्नांची पोटतिडकीने सोडवणूक करण्यासाठी सकारात्मक वृत्तीने राजकीय आणि प्रशासकीय कामकाजात आपल्या अभ्यासू वृत्तीचा ठसा उटविण्यात यशस्वी ठरलेत. माणूसकीचे गौरीशंकर असलेल्या कॅलिडिओस्कोप प्रमाणे अष्टपैलू व बहुआयामी व्यक्तिमत्वाचे धनी असलेल्या आ. श्री. प्रवीणजी पोटे –पाटील यांना भावी यशस्वी राजकीय प्रवासासाठी हार्दिक शुभेच्छा !

**प्रा.श्रीकृष्ण बनसोड,**
समाजभूषण
भ्र.९७६३४०३७४८

# पोलिसांनी राबवला तक्रार निवारण दिवस

**अमरावती:** पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी अमरावती ग्रामीण पोलीस घटकामध्ये सर्व पोलीस स्टेशन मध्ये प्रत्येक शनिवारी तक्रार निवारण दिवस रार्वावण्याबाबत सूचना देण्यात आलेले आहे.

या निमीत्ताने सर्व पोलीस स्टेशन मध्ये प्राप्त होणारे नागरीकांच्या तक्रारी ऐकुण तात्काळ कार्यवाही करण्याबाबत सर्व ठाणेदार यांना आदेशीत करण्यात आले आहे.

त्यानुसार दिनांक ११/०७/२०२६ रोजी निकेतन कदम, पोलीस अधीक्षक अमरावती ग्रामीण हे पोलीस स्टेशन चांदुर रेल्वे तसेच दत्ता तोटेवाड, अपर पोलीस अधिक्षक, अमरावती ग्रामीण हे पोलीस स्टेशन आसेगाव येथे प्रत्यक्ष उपस्थित राहीले तसेच संबंधीत विभागाचे उप-विभागीय पोलीस अधिकारी त्यांचे अधिनिस्त पोलीस स्टेशन येथे उपस्थित राहुन तसेच सर्व पोलीस स्टेशनचे ठाणेदार हे आप आपले पोलीस स्टेशन मध्ये तक्रार निवारण दिवशी नागरीकांच्या एकुण २३८ तक्रारीचे निराकरण करण्यात आले आहे.

नागरीकांना आव्हान करण्यात येते की, त्यांनी आपल्या समस्या, तक्रारी, अडचणी मांडण्याकरीता जास्तीत जास्त संख्येने प्रत्येक शनिवारी तक्रार निवारण दिनाकरीता संबंधीत पोलीस स्टेशन येथे उर्पास्थत रहावे.

# अवकाळी पावसामुळे बाधित शेतकऱ्यांना राज्य शासनाकडून 84.23 कोटींचा निधी मंजूर

## अमरावती विभागातील 28 हजार 751 शेतकऱ्यांना 68 कोटींची मदत

प्रतिनिधी १२ जुलै

**अमरावती:** राज्यात एप्रिल आणि मे २०२६ या कालावधीत झालेल्या अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. महसूल व वन विभागाने या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी ८४ कोटी २३ लक्ष ६५ हजार रुपयांच्या निधी वितरणास अधिकृत मंजुरी दिली आहे. या निर्णयाचा फायदा राज्यातील सहा विभागांतील एकूण ४५ हजार ४२ शेतकऱ्यांना होणार असून, ३८ हजार हेक्टरपेक्षा जास्त बाधित क्षेत्राला यातून दिलासा मिळणार आहे. राज्य शासनाने नुकताच (ता.१० जुलै) यासंदर्भात शासन निर्णय निर्गमित केला आहे.

अतिवृष्टी, पूर व चक्रीवादळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीपिकांचे नुकसान झाल्यास पुढील हंगामामध्ये उपयोगी पडावे याकरिता शेतकऱ्यांना निविष्ठा अनुदान स्वरुपात एका हंगामात एक वेळेस याप्रमाणे राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून मदत देण्यात येते. राज्यात एप्रिल व मे महिन्यात विविध जिल्ह्यांत अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. अवकाळी पावसामुळे शेतीपिकांचे नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर पंचनामे करुन अमरावती, नागपूर, नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर, कोकण विभागांच्या विभागीय आयुक्तांनी नुकसानीसाठी निधी मागणीचा प्रस्ताव राज्य शासनाला सादर केला होता. त्यानुषंगाने मदत निधी शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या दरानुसार ८४ कोटी २३ लक्ष ६५ हजार रुपयांचा निधी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना वितरीत करण्यास शासनाने मंजूरी दिली आहे.

# अखेर शेतकऱ्याचे उपोषण मागे...

## शेतकरी हिताचा विचार करावा-किसान मोर्चा उपाध्यक्ष हरिदास लुंगे

प्रतिनिधी १२ जुलै



**नया वाठोडा:** मोर्शी तालुक्यातील पिंपळखुटा मोठा सर्कल मध्ये येत असलेल्या नया वाठोडा येथे सोमवार दिनांक 6 जुलै रोजी सकाळी 11 वाजता उपोषणाला बसलेल्या शेतकऱ्यांचे आमरण उपोषण हरिदास लुंगे उपाध्यक्ष किसान मोर्चा अमरावती यांचे मध्यस्थीने सोडण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार वृत्त असे की काही वर्षापूर्वी नया वाठोडा पुसला पांदण रस्त्याचे डांबरीकरण झाले त्यामुळे या ठिकाणी रोड चे काम झाल्यावर शेतकऱ्याचे रस्त्यावर आणि पाणी जायचे ठिकाणी सिमेंट पायल्या टाकू असे बोलले होते परंतु जणू शेतकऱ्यांना असे चॉकलेट देऊन संबंधित अधिकारी आणि कंत्राटदार यांनी पळ काढला असे समजून आले. त्यामुळे काही शेतकऱ्यांना शेतात जायला तर काहीना शेतातील पाणी जायला अडचण निर्माण झाली असाच प्रकार शेतकरी विश्वेश्वर वानखडे यांचे सोबत घडला त्यांचे मते शेताचे पाणी पिढ्यानपिढ्या उतारा चे दिशेने नैसर्गिक प्रवाहानुसार रोड चे खालचे बाजूनी जात होते परंतु हे पाणी जाण्यासाठी कुठल्याही प्रकारच्या पायल्या नसल्यामुळे शेतात पाणी साचत होते.

त्यामुळे त्याचे पिकाचे नुकसान होत असल्यामुळे त्यांनी सार्वजनिक बांधकाम उपविभाग मोर्शी यांचे कडे अर्ज केला असता त्या अर्जावर या विभागाने कारवाई करून 2021 मध्ये सिमेंट पायल्या टाकून दिल्या होत्या आणि ते पाणी पाणंद रस्त्याने जाऊन संजय कोल्हे यांच्या शेतातून जात होते असे वानखडे यांनी सांगितले ,परंतु संजय कोल्हे यांनी 2024 मध्ये ते पाणी अडवून पांदण रस्ता व शेजारील पाटबंधारे विभागाच्या हद्दीतील माती चा भराव काढून आपल्या शेतात भरला आणि पाणी कालव्या मध्ये काढून दिले.

संबंधित दोन्ही विभागाने संयुक्त पाहणी केली परंतु पुन्हा चुकीचा निर्णय देऊन शेतकऱ्यावर अन्याय च केला त्यामुळे पुरुषोत्तम काकडे ,जयकुमार अमझरे, रामकृष्ण अमझरे या शेतकऱ्यांनी 6 जुलै रोजी आमरण उपोषण सुरू केले. संबंधित अधिकारी, नायब तहसीलदार,पोलिस प्रशासन यांनी भेटी घेऊन प्रकरण जाणून घेतले पण काही केल्या उपोषण सुटेल असे दिसत नसल्यामुळे दुसऱ्या दिवशी श्री.उमक साहेब कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग अमरावती यांनी स्वतः येऊन स्थळ पाहणी केली परंतु आम्ही आमचे कालव्या मध्ये कोणतेच पाणी घेऊ शकत नाही व इथे कुठलेच बांधकाम करू शकत नाही असा निर्णय दिला असता अखेर हरिदास लुंगे उपाध्यक्ष किसान मोर्चा अमरावती व त्यांचे सहकारी यांच्या मध्यस्थीने दिनांक 7 जुलै रोजी नायब तहसीलदार वानखडे साहेब, पाटबंधारे विभाग चे आडे साहेब,, सार्वजनिक बांधकाम उपविभाग मोर्शीचे बोडखे यांनी लेखी आश्वासन देऊन प्रेमराज वानखडे पोलिस पाटील पुसला यांचे समक्ष निर्णय दिला व निंबू सरबत पाजून अखेर उपोषण सोडण्यात आले. यावेळी जैस्वाल साहेब , जावरकर साहेब,धोटे साहेब ,गावातील शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
रविवार, दि.१२ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com






# शिक्षक पदोन्नतीत गैरप्रकाराची हद्द, अखेर 'ते' पत्र रद्द !

### आधीच पदोन्नती प्रक्रिया पुर्ण केली त्या निर्णयावर परिणाम नाही....

ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी आधीच पदोन्नती प्रक्रिया पुर्ण केली आहे. त्या निवड प्रक्रियेवर कोणताही परिणाम होणार नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. मात्र, राज्यात पदोन्नती प्रक्रियेत एक समान पध्दत राहावी यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा असेही स्पष्ट केले.

## पुढील आदेशापर्यंत कोणतीही कार्यवाही न करण्याचे शिक्षण संचालकांचे निर्देश

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

ज्या पत्राच्या आधारे वाशिम जिल्हा परिषद शिक्षण विभागाने शिक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीची प्रक्रिया राबविली होती, तेच पत्र न्यायालयाने रद्द केल्यामुळे शिक्षण संचालनालयाने पदोन्नती संदर्भात पुढील आदेशापर्यंत कोणतीही कार्यवाही करू नये, असे निर्देश दिले आहेत. त्यामुळे वाशिम जिल्हा परिषदेने घाईघाईत केलेल्या पदोन्नती प्रक्रियेचे पुढे काय होणार, याकडे संबंधित शिक्षकांचे लक्ष लागले असून सेवाज्येष्ठ शिक्षकांना न्याय मिळण्याची आशा बळावली आहे.




शिक्षक संवर्गामधून मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी व पदवीधर शिक्षक अशा पदांवर सेवा ज्येष्ठतेनुसार पदोन्नती केली जाते. मात्र शिक्षक पात्रता परीक्षा (ऊऊं/एऊऊं) उत्तीर्ण असणे बंधनकारक असल्याचा निर्णय न्यायालयाने दिला होता. त्यानुसार प्राथमिक शिक्षण संचालनालयाने १४ मे २०२६ रोजी पत्र काढून पदोन्नतीसाठी शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक असल्याचे नमूद केले होते.या पत्राच्या आधारे वाशिम जिल्हा परिषद शिक्षण विभागाने ३ जुलै २०२६ रोजी शिक्षक संवर्गातील पदोन्नती प्रक्रिया पार पाडली. मात्र या प्रक्रियेत सेवाज्येष्ठ शिक्षकांना डावलण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. न्यायालयाचा अंतिम निर्णय येईपर्यंत पदोन्नती प्रक्रिया थांबवावी, अशी मागणी संबंधित शिक्षकांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे केली होती. मात्र ती मागणी विचारात न घेता पदोन्नती प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.याशिवाय, एऊऊं परीक्षा उत्तीर्ण शिक्षकांचाही पदोन्नती प्रक्रियेत विचार करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली होती. मात्र तीही जिल्हा परिषदेने फेटाळल्याने सुमारे १२८ शिक्षकांवर अन्याय झाल्याचा आरोप करण्यात आला.दरम्यान, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल याचिका क्रमांक ४५७४/२०२६ वर १० जुलै २०२६ रोजी निर्णय देण्यात आला. न्यायालयाने प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे १४ मे २०२६ रोजीचे पत्र रद्द ठरविले.यानंतर शिक्षण संचालनालयाने १० जुलै रोजी नवीन पत्र जारी करून शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व पदवीधर शिक्षकांच्या पदोन्नतीबाबत पुढील शासन निर्देश मिळेपर्यंत कोणतीही कार्यवाही करू नये, असे स्पष्ट निर्देश दिले.राज्यातील काही जिल्हा परिषदांमध्ये शिक्षक पदोन्नती प्रक्रिया पूर्ण झाली असली तरी अनेक जिल्हा परिषदांनी ती अद्याप राबविलेली नाही. मात्र वाशिम जिल्हा परिषदेलाच एवढी घाई का झाली, असा प्रश्न उपस्थित होत आहे.दरम्यान, सेवाज्येष्ठ शिक्षक व एऊऊं उत्तीर्ण शिक्षकांनी दाखल केलेल्या याचिकेवरील निर्णयामुळे आता वाशिम जिल्हा परिषदेने केलेली पदोन्नती प्रक्रिया रद्द होणार का, तसेच नव्याने पदोन्नती करताना सेवाज्येष्ठ व पात्र शिक्षकांचा समावेश केला जाणार का, याकडे संबंधित शिक्षकांचे लक्ष लागले आहे.तसेच न्यायालयाच्या आदेशाची प्रतीक्षा न करता जिल्हा परिषदांनी घाईघाईने पदोन्नती प्रक्रिया पूर्ण केल्याने सेवाज्येष्ठ शिक्षकांना डावलण्यात आले होते. त्यामुळे आता त्यांना न्याय मिळण्याची शक्यता बळावल्याची चर्चा शिक्षकांमध्ये सुरू आहे.

### ज्येष्ठता बदलत नाही...

टीईटी / सीटीईटी पात्रता मिळाल्याने शिक्षकाची ज्येष्ठता बदलत नाही. असे न्यायालयाने निर्णयात नमूद केले आहे. जेष्ठता आणि पदोन्नतीसाठी पात्रता या दोन स्वतंत्र बाबी असून सेवेत रूजू झाल्याच्या तारखेनुसार ज्येष्ठता निश्चित होते. टीईटी ही केवळ पदोन्नतीसाठी आवश्यक पात्रता आहे. त्यामुळे पात्रता आधी मिळाल्याच्या कारणावरून कनिष्ठ शिक्षकाला ज्येष्ठ शिक्षकाच्या पुढे स्थान देता येणार नाही. असे न्यायालयाने निर्णयात स्पष्ट केले आहे.

---

## थोडक्यात

### दस्तापूर येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर तालुक्यातील ग्राम दस्तापुर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता तिसरी आणि चौथीच्या विद्यार्थ्यांना मधुश्रम फाउंडेशनच्या वतीने शैक्षणिक साहित्याचे वाटप ११ जुलै रोजी करण्यात आले.

मुलांमध्ये शिक्षणाची ओढ निर्माण व्हावी आणि त्यातून सर्वांना शिक्षणाचे महत्त्व कळावे, या मुख्य उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापक के. टी. मुंजे होते. त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना शिक्षण, आरोग्य आणि पर्यावरण या विषयांवर मार्गदर्शन करत शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. गावच्या सरपंच पिंकीताई मुंजे, उपसरपंच आनंद आटपाडकर, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सपना खांडेकर आणि शाळा समिती सदस्य पूनम खांडेकर यांची कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी माजी सरपंच नामदेवराव गळवे, आशा वर्कर सुनिता गळवे, खुशाल वाळेखिंडे, प्रशांत मुंजे, महादेव कोळेकर आणि शेषराव मुंजे उपस्थित होते.या उपक्रमांतर्गत शाळेतील मुला-मुलींना स्कूल बॅग, रजिस्टर आणि पेन देण्यात आले. कार्यक्रमाची सांगता विद्यार्थ्यांना चॉकलेट वाटून करण्यात आली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन उषा मॅडम यांनी केले, तर अश्विनी वाठोरे मॅडम यांनी उपस्थितांचे आभार मानले.





---

## बोअरवेलमधील मोटारपंप कापून आत टाकला !

### वरून दगड टाकून बोअरवेल बुजविण्याचा प्रयत्न

### शेतकऱ्याची पोलिस स्टेशनला तक्रार




● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

रिसोड तालुक्यातील येवता येथील शेतकरी मंगलसिंग ठाकूर यांच्या शेतातील बोअरवेलमध्ये अज्ञात व्यक्तीने खोडसाळपणा करत मोटारपंपाचा पाईप कापून मोटारपंप पाईपसह बोअरवेलमध्ये सोडून दिला. एवढ्यावरच न थांबता बोअरवेलमध्ये वरून दगड टाकून ती बुजविण्याचाही प्रयत्न करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी मंगलसिंग ठाकूर यांनी शिरपूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून संबंधित अज्ञात व्यक्तीचा शोध घेऊन कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

मंगलसिंग ठाकूर यांच्या शेतातील बोअरवेलला मुबलक पाणी होते त्याच्याच माध्यमातून ते शेतीचे सिंचन करून चांगले उत्पादन घेत होते. मात्र, अज्ञात व्यक्तीने सूडबुद्धीने हे कृत्य केल्याचा आरोप ठाकूर यांनी केला आहे.

मोटारपंपाचा पाईप कापल्यामुळे मोटारपंप बोअरवेलमध्ये अडकून पडला असून वरून मोठमोठे दगड टाकल्याने बोअरवेलही निकामी झाली आहे.या घटनेमुळे ठाकूर यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून आता सिंचनासाठी त्यांना नवीन बोअरवेल खोदावी लागणार आहे. तसेच अडकलेला मोटारपंप बाहेर निघण्याची शक्यता नाही त्यामुळे नवीन यंत्रणा बसविण्यासाठीही मोठा खर्च करावा लागणार आहे.

अशा प्रकारचे खोडसाळ कृत्य परिसरातील इतर शेतकऱ्यांसोबतही घडू नये, यासाठी संबंधित अज्ञात व्यक्तीचा तातडीने शोध घेऊन त्याच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

## सौ. ललीताताई गोदमले यांना जिजामाता कृषी भूषण पुरस्कार

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपिर तालुक्यातील रामगावं मोतसांवगा येथील सौ. ललिताताई विश्वासराव गोदमले यांचे सामाजिक व शेतीविषयक कार्य पाहता तसेच त्यांचे इतर क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी असल्यामुळे मुंबई येथे जिजामाता कृषी भूषण पुरस्कार १ जुलै २०२६ रोजी राज्यपाल विष्णू देव वर्मा यांचे हस्ते देण्यात आला आहे.

मूळच्या मंगरूळपीर तालुक्यातील रामगाव हे त्यांचे गाव असून सद्या ते मंगरूळपीरला राहत आहे . सदर कुटूंबाची व शेतीची जबाबदारी सांभाळून समाज कार्यात आवर्जून सहभाग घेत असतात, त्यांच्या या कार्यामुळेच त्यांना पुरस्कार देण्यात आला आहे. मंगरूळपीर येथे



त्यांच्या निवासस्थानी सामाजिक चळवळीतल्या महिला सौ. मंगलाताई कैलास ढगे आंध आदिवासी महिला जिल्हा अध्यक्षा वाशिम, सौ. पुष्पाताई पवणे, सौ. मोहिनी अगुलदरे, सौ. गंगा घोरसडे, सौ. वंदनाताई गायकवाड, सौ. शारदा गिरारकर, सौ. सुनिता वाघमारे, सौ. लक्ष्मी सातपुते, व ईतर महिला मंडळींनी सौ. ललिता ताईंचा वरील पुरस्कार मिळाल्याने शाल श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला आहे.ललिता ताईंना वरील पुरस्कार मिळाल्याने त्यांचे परिसरात कौतुकही होत आहे.

## लाखाने फसविण्याची युक्ती, बनावट नोकरीची नियुक्ती !

### गुन्हे शाखेकडे सखोल चौकशीची मागणी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

सिव्हिल हॉस्पिटलमध्ये वॉर्ड अटेंडंट पदावर नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत बनावट नियुक्ती आदेश देऊन प्रत्येकी १ लाख ५० हजार रुपये उकळल्याप्रकरणी दोन युवकांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे तक्रार दाखल करत सखोल चौकशी व कठोर कारवाईची मागणी केली आहे.

शिरसाळा (ता. मालेगाव) येथील वैभव प्रभाकर पडघान आणि आकाश राजेश पट्टेबहादूर यांनी स्वतंत्र निवेदनाद्वारे पोलीस अधीक्षक, गुन्हे शाखा, वाशीम यांच्याकडे तक्रार केली आहे. तक्रारीनुसार, तांदळी बुद्रुक येथील प्रतीक प्रभाकर कांबळे याने सिव्हिल हॉस्पिटल, वाशीम येथे वॉर्ड अटेंडंट पदावर नियुक्ती करून देण्याचे आश्वासन देत बनावट नियुक्ती आदेश दिले. त्यासाठी दोघांकडून प्रत्येकी १ लाख ५० हजार रुपये घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. अशा प्रकारे एकूण ३ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे.

या प्रकरणात वापरण्यात आलेल्या नियुक्ती आदेशांवर शासकीय शिक्के व स्वाक्षऱ्यांची बनावट कागदपत्रे वापरण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

## एकांब्यात पावसाळ्यात पाणीटंचाई !

### * नागरिकांना पाण्यासाठी दाहीदिशा * ग्रामपंचायत प्रशासनाचे दुर्लक्ष



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम तालुक्यातील एकांबा गावामध्ये ग्रामपंचायत प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे भर पावसाळ्यात नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करण्याची वेळ आली आहे.सद्या नागरिकांना 'पाण्यासाठी दाहिदिशा' भटकंती करून पिण्याचे पाणी आणावे लागत आहे. एकांबा गावामध्ये एका शेतकऱ्याच्या मालकीच्या विहिरीचे ग्रामपंचायतीने अधिग्रहण केले आहे.त्या विहिरीतून गावामध्ये पाणीपुरवठा करण्यात येतो. मागील १०/१२ दिवसापासून अचानक हा पाणी पुरवठा बंद करण्यात आल्याने एकांबा गावातील गोरगरीब,मजूरदार नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली आहे. एकांबा गावातील कृत्रिम पाणीटंचाईबाबत ग्रामस्थांनी ग्रामसेवक सावके यांना फोनद्वारे कळविलेले आहे.ग्रामसेवक सावके यांनी पाणी पुरवठा सुरु करण्यासाठी आजपर्यंत कोणताही पुढाकार घेतला नसल्याची माहिती पाण्यासाठी दाहीदिशा फिरणाऱ्या गोरगरीब नागरिकांनी दिली आहे.

### संतप्त ग्रामस्थ उपोषणाच्या तयारीत

एकांबा गावातील पाणीपुरवठा १०/१२ दिवसापासून अचानक बंद झालेला असल्याची माहिती ग्रामसेवकांना माहित असुनही गावातील गोरगरीबांना भर पावसाळ्यात पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.दोन दिवसात ग्रामपंचायत प्रशासनाने गावातील पाणीपुरवठा सुरळीत करावा.अन्यथा संतप्त नागरिक वाशीम येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसण्याच्या तयारीत आहेत.

**रामप्रसाद खंडारे** ,समाजसेवी, एकांबा

## हक्काची करा कदर केनवडलाच द्या महसुलाचे घर !

### विठ्ठलराव केनवडकर यांची मागणी; अप्पर तहसील कार्यालय केनवड येथेच कायम ठेवण्याची प्रशासनाकडे विनंती

●सिटी न्युज ब्युरो @ केनवड●

केनवड येथे प्रस्तावित अप्पर तहसील कार्यालयाबाबत हरकती समोर येत असताना सामाजिक कार्यकर्ते विठ्ठलराव केनवडकर यांनी केनवडच्या बाजूने ठाम भूमिका घेतली आहे. नागरिकांची सोय, उपलब्ध पायाभूत सुविधा आणि जनहिताचा विचार करता अप्पर तहसील कार्यालय केनवड येथेच कायम ठेवावे, अशी मागणी त्यांनी निवेदनाद्वारे प्रशासनाकडे केली असून, शासनाने मूळ निर्णयात कोणताही बदल करू नये, असा आग्रहही त्यांनी धरला आहे.



रिसोड तालुक्यात प्रस्तावित अप्पर तहसील कार्यालयाचे मुख्यालय केनवड येथेच कायम ठेवण्यात यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते विठ्ठलराव केनवाडकर यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी तहसीलदार प्रतीक्षा तेजंकर यांच्यामार्फत प्रशासनाला निवेदन सादर करून लोकहित, भौगोलिक सोय आणि उपलब्ध पायाभूत सुविधांचा विचार करून शासनाने आपला मूळ निर्णय कायम ठेवावा, अशी विनंती केली आहे. निवेदनात केनवड हे रिसोड तालुक्यातील मोठे, मध्यवर्ती आणि सर्व सुविधांनी सुसज्ज गाव असल्याचे नमूद करण्यात आले आहे. प्रस्तावित अप्पर तहसील कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात केनवड व गोवर्धन महसूल मंडळातील अनेक गावांचा समावेश असून, या गावांतील नागरिकांचे दैनंदिन व्यवहार, बँकिंग, बाजारपेठ, आरोग्य सेवा आणि शासकीय कामकाजासाठी केनवड हेच प्रमुख केंद्र असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. केनवडमध्ये भारतीय स्टेट बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची शाखा, सहकारी पतसंस्था, शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच विविध शासकीय व नागरी सुविधा उपलब्ध आहेत. दर गुरुवारी भरणारा आठवडी बाजारही पंचक्रोशीतील शेतकरी आणि नागरिकांसाठी महत्त्वाचा आधार ठरत असल्याने या भागातील मोठी लोकवर्दळ केनवडकडे असते.

तसेच मालेगाव–मेहकर मार्गावरील केनवड हे वाहतुकीच्या दृष्टीनेही सोयीचे ठिकाण असल्याने येथे अप्पर तहसील कार्यालय सुरू झाल्यास नागरिक, शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांची गैरसोय दूर होईल. महसूल विभागाची कामे अधिक जलद, पारदर्शक आणि सुलभ होतील, असा दावाही निवेदनात करण्यात आला आहे. परिसरातील नागरिकांची गरज, भौगोलिक परिस्थिती आणि उपलब्ध सुविधांचा विचार करून प्रस्तावित अप्पर तहसील कार्यालय केनवड येथेच कायम ठेवावे, अशी आग्रही मागणी विठ्ठलराव केनवाडकर यांनी प्रशासनाकडे केली आहे.

## विदर्भ साहित्य संघ शाखेच्या अध्यक्षपदी डॉ.अनघा कांत तर सचिव पदी आशिष तांबोळकर

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

विदर्भ साहित्य संघ कारंजा शाखेची महत्त्वाची सभा रविवार ५ जुलै रोजी शाखा सचिव आशिष तांबोळकर यांच्या निवासस्थानी पार पडली.ज्येष्ठ साहित्यिक व साहित्य संघाचे माजी अध्यक्ष सुभाष गढीकर यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा संपन्न झाली.

या सभेमध्ये विदर्भ साहित्य संघाच्या केंद्रीय कार्यकारी मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीत विजयी झालेल्या नवनियुक्त अध्यक्ष व सर्व सन्माननीय पदाधिकाऱ्यांच्या अभिनंदनाचा ठराव एकमुखाने मंजूर करण्यात आला.तसेच मागील वर्षभरात कारंजा शाखेने राबवलेल्या विविध उपक्रमांचा आढावा सादर करण्यात आला.

केंद्रीय कार्यकारी मंडळाच्या सूचनेनुसार, कारंजा शाखेचे सन २०२६ ते २०३१ या पंचवार्षिक कालावधीसाठी नवीन कार्यकारी मंडळ सर्वानुमते निवडण्यात आले. नवीन कार्यकारी मंडळ कार्यकाळ सन २०२६ ते २०३१ पर्यंत राहीलअध्यक्ष:





डॉ.सौ.अनघा अजय कांत, उपाध्यक्ष सौ.सीमा आशिष तांबोळकर, सचिव आशिष प्रभाकरराव तांबोळकर, कोषाध्यक्ष कविश भरत गहाणकरी,कार्यक्रम प्रमुख परमेश्वर श्रीराम व्यवहारेपरीक्षा समिती प्रमुख ओंकार शेषराव पवारकार्यकारिणी सदस्य सौ.रेखा शिरीष चवरे,सौ.सुषमा सुभाष गढीकर,सौ.सुरेखा चारुदत्त दंडवते,प्रा.राजेंद्र रघुनाथ बाकल,डॉ. मेघनाद मधुकर भावे,डॉ.जयंत प्रभाकर बक्षी,डॉ.अजय विनायकराव कांत. सभेच्या शेवटी,सन २०२५ ते २०२६ या कालावधीत निधन झालेल्या सर्व थोर साहित्यिकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# बियाणे उगवलेच नाही; राष्ट्रवादी आक्रमक

## माजी आमदार दिलीपकुमार सानंदा यांची कृषी मंत्र्यांशी दूरध्वनीवरून चर्चा : तातडीने पंचनाम्यांचे आदेश

प्रतिनिधी १२ जुलै

**खामगाव :** जिल्ह्यात सोयाबीनचे बियाणे उगवण न झाल्याच्या तक्रारींवरून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेत शनिवारी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना जाब विचारला. यावेळी माजी आमदार दिलीपकुमार सानंदा यांनी कृषी विभागाच्या कार्यालयातून कृषिमंत्री दत्ता भरणे यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली. त्यानंतर मंत्र्यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतीचे तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांनाकेल्या.

जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये पेरणीनंतर सोयाबीनची उगवण न झाल्याच्या तक्रारी वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष ॲड. नाझेर काझी आणि माजी आमदार दिलीपकुमार सानंदा यांनी खामगाव येथील तालुका कृषी अधिकारी कार्यालयाला भेट दिली. प्रभारी उपविभागीय कृषी अधिकारी खोंदील, तालुका कृषी अधिकारी पवार, जिल्हा गुणनियंत्रण अधिकारी अंगाईत तसेच अमोल बंड उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करत नुकसानग्रस्तांना तातडीने मदत देण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.

### प्रक्रिया संथ असल्याचा आरोप

दुबार पेरणीचे संकट ओढवल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याचे सांगत तातडीने पंचनामे करून शासनाकडून मदत देण्याची मागणी करण्यात आली. कृषी विभागाकडून पंचनाम्यांची प्रक्रिया अत्यंत संथ असल्याचा आरोपही करण्यात आला.

### दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करा!'

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची संख्या मोठी असल्याने ऑनलाइन अर्जाची सुविधा उपलब्ध करून पंचनाम्यांची प्रक्रिया गतिमान करावी, अशी मागणीही राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी केली. शेतकऱ्यांना तातडीने दिलासा मिळावा, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. बैठकीनंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी शेतकऱ्यांच्या समर्थनार्थ घोषणाबाजी केली.

# एक पेड माँ के नाम' अभियानांतर्गत वृक्षदिंडी

## विद्यार्थ्यांकडून वृक्षसंवर्धनाचा संदेश

**खामगाव :** वनमहोत्सवा निमित्त 'एक पेड माँ के नाम' अभियानाअंतर्गत शहरातील जिल्हा परिषद (माजी शासकीय) माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, (प्रादेशिक) आणि सामाजिक वनीकरण विभागाच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी वृक्षदिंडी काढून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) कार्यालयापासून खामगाव शहर पोलिस ठाण्यापर्यंत काढण्यात आलेल्या वृक्षदिंडीत विद्यार्थ्यांनी 'झाडे लावा, झाडे जगवा'सह विविध पर्यावरणपूरक घोषणा देत ११ जुलै रोजी वृक्षदिंडी काढण्यात आली होती.जनजागृती केली. त्यानंतर शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. तसेच विपर्यावरणपूरक घोषणा देत ११ जुलै रोजी वृक्षदिंडी काढण्यात आली होती.जनजागृती केली. त्यानंतर शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा घेऊन विजेत्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले. उपवनसंरक्षक जमीर शेख व सहाय्यक वनसंरक्षक व्ही. एम. काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला. यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी स्वप्निल पवार, वनपरिक्षेत्र अधिकारी (सामाजिक वनीकरण) बोबडे, वनपरिक्षेत्र अधिकारी यू आर. राऊत, प्राचार्य मुळे, ठेंगझोडे, पडघान, वृषाली मोहाने तसेच वन विभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. वनपरिक्षेत्र अधिकारी बोबडे यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून दिले. प्रत्येक नागरिकाने वाढदिवस किंवा अन्य विशेष प्रसंगी किमान एक वृक्ष लावण्याचा संकल्प करावा, असे आवाहन वनपरिक्षेत्र अधिकारी स्वप्निल पवार यांनी केले.द्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा घेऊन विजेत्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले. उपवनसंरक्षक जमीर शेख व सहाय्यक वनसंरक्षक व्ही. एम. काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला. यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी स्वप्निल पवार, वनपरिक्षेत्र अधिकारी (सामाजिक वनीकरण) बोबडे, वनपरिक्षेत्र अधिकारी यू आर. राऊत, प्राचार्य मुळे, ठेंगझोडे, पडघान, वृषाली मोहाने तसेच वन विभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# खामगाव-पंढरपूर 'विठ्ठल दर्शन एक्स्प्रेस'च्या वेळापत्रकात बदल करण्याची मागणी

## रेल्वे प्रशासनाला उद्धवसेनेचे निवेदन; आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी १२ जुलै

**खामगाव :** पंढरपूर 'विठ्ठल दर्शन एक्स्प्रेस'च्या वेळापत्रकात बदल करून आषाढी एकादशी नंतर परतीच्या प्रवासासाठी विशेष फेरीचे नियोजन करावे, अशी मागणी उद्धवसेने च्या वतीने रेल्वे प्रशासनाकडे करण्यात आली आहे. मागणी मान्य न आंदोलन झाल्यास छेडण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

खामगाव रेल्वे प्रशासनामार्फत भुसावळ रेल्वे प्रबंधकांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, आषाढी एकादशी शनिवार, दि. २५ जुलै रोजी असल्याने बहुतांश वारकरी एकादशीचे दर्शन घेऊन द्वादशी (बारस) नंतर परतीचा प्रवास करतात. त्यामुळे सध्याच्या वेळापत्रकामुळे वारकऱ्यांची गैरसोय होणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर रेल्वे

प्रशासनाने वेळापत्रकात तातडीने बदल करून आषाढी एकादशीनंतर पंढरपूर-खामगाव परतीच्या विशेष फेरीचे नियोजन करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी उद्धवसेनेचे श्रीराम खेलदार, रवी जैन, महादेव महाराज बोराडे, सुभाष ठाकूर, बाबा काळे, राहुल मनमोडे, अक्षय हातेकर, हेमंत खारोडे, गजानन होगे, रामेश्वर लहुडकर, प्रमोद फाटे तसेच पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सद्यस्थितीत असे आहे रेल्वे फेरीचे नियोजन खामगाव-पंढरपूर 'विठ्ठल दर्शन एक्स्प्रेस'चे यंदाचे वेळापत्रक वारकऱ्यांच्या सोयीचे नसल्याची तक्रार करण्यात आली आहे. सध्याच्या नियोजनानुसार ही रेल्वे मंगळवार, दि. २१ जुलै आणि गुरुवार, दि. २३ जुलै रोजी खामगावहून पंढरपूरकडे रवाना होणार आहे.त्यानंतर परतीच्या फेऱ्या अनुक्रमे बुधवार, दि. २२ जुलै आणि शुक्रवार, दि. २४ जुलै रोजी नियोजित करण्यात आल्या आहेत.

# जिल्हा शल्य चिकित्सक यांना दिव्यांग समस्याचे निवेदन

प्रतिनिधी १२ जुलै

**खामगाव :** घटाखालील भाग असलेल्या खामगाव जिल्हा सामान्य रुग्णालयात असलेल्या नाक, कान, घसा तज्ञ व मतिमंद सह विविध विभागमध्ये तपासणी दरम्यान वेगवेगळे डॉक्टर यांची नेमणूक करण्यात यावी. यासाठी आज विराट मल्टिपर्पज फाउंडेशनच्या वतीने कविताताई इंगळे व प्रेस क्लब चे अध्यक्ष किशोर भोसले यांच्या नेतृत्त्वाखाली डॉ. दत्तात्रय बिराजदार यांना निवेदन देण्यात आले.

नाक,कान,घसा तज्ञ डॉक्टर कायम उपलब्ध करून देणे किंवा डॉ जयंत सोनोने यांची बदली रद्द करणे यासह मतिमंद डॉक्टर वेगवेगळे देणे ही मुख्य मागणी यातून करण्यात आली. जिल्हा सामान्य रुग्णालयचे कार्यालयाच्या अधिनास्थ असलेलं जिल्ह्यातील मुख्य असलेले खामगाव येथील सामान्य रुग्णालय येथे खामगावसह शेगाव, नांदुरा, मलकापूर, जलगाव, जामोद व संग्रामपूर येतील रुग्ण तपासणीसाठी येत असतात पण याठिकाणी मागील काळात कार्यरत असलेले डॉ. जयंत सोनोने यांची बदली करण्यात आली. वास्तविक ती बदली करताना त्यांच्या जागी इतर डॉक्टर नियुक्त करणे गरजेचे होते.

या नाक कान घसा तज्ञ डॉक्टर च्या अनुपस्थितीमुळे असंख्य रुग्णाचे हालहोत आहेत. तर या ठिकाणी दर बुधवारी होत असलेली नाक, कान, घसा तपासणी रखडलेली आहे. त्यामुळे दिव्यांग रुग्ण तपासणी शिबिर नावाचेच राहिलेलं आहे. त्यामुळे या ठिकाणी तत्काळ नाक, कान, घसा तज्ञ डॉक्टर उपलब्ध करून देण्यात यावे. तसेच मतिमंद बोर्डमध्ये असलेले एकमेव डॉक्टर याठिकाणी कायम आहे. त्या ठिकाणी मुख्यालयातील डॉक्टर ठेवत किमान दोन बोर्ड करिता प्रत्येक महिन्याला दुसऱ्या डॉक्टरची नियुक्ती करण्यात यावी जेणेकरून नियमित बोर्ड कार्यरत राहील व त्यामधून पारदर्शक कारभार करने सोईचे होईल. असे निवेदनात कळविण्यात आले आहे. निवेदन देतेवेळी प्रेस क्लबचे अध्यक्ष किशोर आप्पा भोसले दिव्यांग शक्तीचे मनोज नगरनाईक विराट मल्टिपर्पज फाउंडेशन जिल्हा अध्यक्ष कविताताई इंगळे, पद्माकर धुरंधर, रुपाली राजपूत, मो शोफियन अहमद आदी यावेळी उपस्थित होते.

# महसूल प्रशासनाच्या मध्यस्थीने शेतरस्त्याचा वाद मिटला!

**नांदुरा :** तालुक्यातील पिंपळगावधांडेयेथेशेतरस्त्यावरून निर्माण झालेला वाद महसूल प्रशासनाच्या मध्यस्थीने निकाली काढण्यात आला. नायब तहसीलदार मार्कड यांच्या मार्गदर्शनाखाली १० जुलै रोजी पंचांसमक्षशेतरस्ताखुलाकरण्यात आला.

यावेळी अर्जदार गुलाब आनंदा धांडे, तसेच गैरअर्जदार सिद्धार्थ किसन तायडे आणि शांताबाई देवीदास धांडे यांच्यात शेतरस्त्या बाबत चर्चा झाली. सध्या शेतात पेरणी झालेली असल्याने उभ्या पिकाचे नुकसान टाळण्यासाठी बैलजोडी व पाऊलवाटेने शेतीची मशागत करण्यास संमती देण्यात आली. पीक काढणीनंतर बैलगाडीच्या वाहतुकीसाठी शिवदांड मोकळा करून देण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला, तसेच २०२६-२७ च्या उन्हाळी हंगामातील पीक काढणीनंतर बैलगाडीने ये-जा करण्यास कोणतीही हरकत नसल्याचे गैरअर्जदारांनी मान्य केले. विहिरीलगतच्या मार्गाने तसेच मातीच्या ढिगाऱ्याच्या पूर्व बाजूने अर्जदाराला ये-जा करण्यासही संमती देण्यात आली. पाण्याचा निचरा सुरळीत होण्यासाठी नाल्यात मोठा सिमेंटचा पाइप टाकण्यातआला,तसेचजेसीबीच्या साहाय्याने शेतरस्ता मोकळा करण्यात आला. कामादरम्यान उभ्यापिकाचेनुकसानहोणारनाही, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. यावेळी तलाठी चतूर, मंडळ अधिकारी वानखेडे, पोलिस अधिकारी, ग्रामस्थ, पंच तसेचशेतकरीउपस्थितहोते.

# श्री गजानन महाराज इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परिक्षेमध्ये सुयश

प्रतिनिधी १२ जुलै

**शेगांव:** शिस्तप्रिय व गुणवत्तेचा उच्चांक गाठणारी श्री गजानन महाराज इंग्लिश स्कूल पुन्हा एकदा आपल्या यशाची पताका अभिमानाने फडकवत आहे. पुर्व प्राथमिक व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा 2026 चा निकाल नुकताच जाहीर झाला असुन. गुणवत्ता यादीमध्ये इयत्ता 5 वी चे एकुण 05 विद्यार्थी तसेच इयत्ता 8 वी चे एकुण 13 विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहे. इ. 5 वी मधुन मृन्मय अमृतराव वनारे 45 वा मेरीट, चैतन्य निलेश होनाळे 77 वा मेरीट, शर्विल सुधासु उमाळे 91 वा मेरीट, निधीश अभिजीत सुरोसे 138 वा मेरीट, गौरी सुरेश वानखडे 149 वा मेरीट आली असुन.. इयत्ता 8 वी मधुन विवेक




सतिष बोडखे 04 था मेरीट, कु रिध्दी रमेश आळसी 06 वी मेरीट, खुशवंत चितामण देशमुख 10 वा मेरीट, स्वरीत सागर भुयारकर 19 वा मेरीट, कु श्रेयशी रविन्द्र निळे 20 वी मेरीट, कु लावण्या अनिलकुमार सुरोसे 31 वी मेरीट, कृष्णराज ज्ञानदेव धनोकार 40 वा मेरीट, कु सई अविनाश पाटील 41 वी मेरीट, कु सिध्दी रमेश आळसी 52 वी मेरीट, अनुज सुनिल पिसे 54 वा मेरीट, गजानन आत्माराम शेजोळे 65 वा मेरीट, पार्थ श्रीकृष्ण वाघ 96 वा मेरीट, कु रिध्दी शैलेष मिश्रा 119 वी मेरीट आली असुन शाळेच्या नावलौकिकात भर घातली आहे. या घवघवीत यशामागे शाळेच्या कुशल व्यवस्थापनाची दूरदृष्टी शिक्षकवृंदाची मेहनत, विद्यार्थ्यांची चिकाटी आणि पालकांचे सतत सहकार्य हे घटक आहेत. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय आपल्या आई वडील, शिक्षकवर्ग तसेच श्री गजानन महाराजांच्या कृपाशीर्वादाला दिले आहे. शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, व संस्थेचे पदाधिकारी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मनपूर्वक अभिनंदन केले आणि त्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# शिक्षकांवरील अतिरिक्त कामे कमी करा जीर्ण शाळांची दुरुस्ती करा - युवासेना

प्रतिनिधी १२ जुलै

**चिखली :** शिक्षकांवरील अतिरिक्त शासकीय कामांचा बोजा तातडीने कमी करून त्यांना केवळ अध्यापनासाठी वेळ उपलब्ध करून द्यावा, तसेच जीर्ण व नादुरुस्त शाळा इमारतींची जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून दुरुस्ती करण्यात यावी, या प्रमुख मागण्यांसाठी युवासेना जिल्हाप्रमुख नंदू कहाडे यांच्या नेतृत्वात शहरप्रमुख श्रीरामभाऊ झोरे शहर संघटक प्रीतमभाई गैची शहरप्रमुख आनंद गैची यांच्या प्रमुख उपस्थितीत शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, शिक्षकांवर विविध शासकीय योजना, सर्वेक्षणे आणि प्रशासकीय कामांचा वाढता भार टाकला जात असल्याने त्यांचे शाळा व विद्यार्थ्यांकडे अपेक्षित लक्ष राहत नाही. परिणामी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणावर परिणाम होत असून शाळेतील शिस्त, संस्कार आणि विद्यार्थ्यांवरील देखरेख कमी होत आहे. याचाच गैरफायदा घेऊन काही विद्यार्थी व्यसनांच्या आहारी जात असल्याची चिंताजनक परिस्थिती निर्माण होत आहे. विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन, समुपदेशन आणि शिक्षकांचा सातत्यपूर्ण सहवास मिळणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तसेच तालुक्यातील अनेक शाळा इमारती जीर्ण व धोकादायक अवस्थेत असून विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. पावसाळ्यात या इमारतींमध्ये शिक्षण घेणे अधिकच धोकादायक ठरत असल्याने जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली. शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी शिक्षकांना अध्यापनासाठी, आवश्यक वेळ, विद्यार्थ्यांना सुरक्षित शैक्षणिक वातावरण आणि शाळांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी असल्याचे युवासेनेने स्पष्ट केले आहे. युवासेना जिल्हाप्रमुख नंदू कराडे यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आलेल्या या निवेदनावर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा विद्यार्थ्यांच्या हितासाठी युवासेनेच्यावतीने तीव्र लोकशाही आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला. यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख नंदू कहऱ्हाडे, शहर प्रमुख श्रीरामभाऊ झारे, शहरसंघटक प्रीतमभाई गैची, उपजिल्हाप्रमुख अशोक राजपूत, शहरप्रमुख युवानेते आनंद गैची, शिवसेना नेते लालसिंग मोरे, सखाराम पाटील उपतालुकाप्रमुख राहुल मिसाळ, हरीभाऊ इंगळे, छगनराव वानखेडे, राहुल मिसाळ निवृत्ती घुबे, शुभम वानखेडे, मदनराजे आकाळ, उपशहर प्रमुख समाधान जाधव, रवीअप्पा पेठकर, पुंजाजी शेळके, अनिल जावरे, सोहेल शहा, किसानसेना तालुकाप्रमुख नारायण वाणी, अशोकराव मोहिते, दिनकर मोरे, गजानन डुकरे, लक्ष्मण इंगळे, राजू इंगळे, अंकुश इंगळे, संजय कदम, प्रदीप सपकाळ, गजानन फोलाने, दत्ता मेंद, कृष्णा फोलाने, गौतम गवई, संजय सोळंकी, सिद्धेश्वर सोळंकी, सोपान भालेकर, सुरज असोलकर, किशोर महाले तसेच असंख्य शिवसेना युवासेना पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

# जुन्या वादातून लोखंडी रॉडने हल्ला; तरुण गंभीर जखमी

## खामगाव शहर पोलिसांत गुन्हा दाखल

प्रतिनिधी १२ जुलै

**खामगाव :** शहरातील बाळापूर फैल, मशिदी जवळील परिसरात जुन्या वादाच्या कारणावरून एका तरुणावर लोखंडी रॉडने जीवघेणा हल्ला केल्याची घटना १० जुलै रोजी दुपारी घडली. या हल्ल्यात तरुणाच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून, त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

याप्रकरणी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, फिर्यादीच्या मुलगा आणि आरोपी यांच्यात यापूर्वी काही कारणावरून वाद झाला होता. त्याच वादातून १० जुलै रोजी दुपारी सुमारे १:३० वाजण्याच्या सुमारास आरोपीने फिर्यादीच्या मुलाच्या डोक्यावर लोखंडी रॉडने वार करून गंभीर जखमी केले. घटनेनंतर जखमीला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

या प्रकरणी मंगला बबन गायकवाड (५०, रा. बाळापूर फैल, मशिदी जवळ, खामगाव) यांनी दिलेली तक्रार आणि वैद्यकीय अहवालावरून शेख सलमान शेख अमिर (वय ४०, रा. बाळापूर फैल, मशिदी जवळ, खामगाव) याच्याविरुद्ध खामगाव शहर पोलिस ठाण्यात भारतीय न्यायसंहिता कलम ११८ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस अंमलदार संतोष इटमल्लू करीत आहेत.

# अखेर मातृतीर्थाला मिळाल्या 2 राष्ट्रमाता जिजाऊ बसेस

प्रतिनिधी १२ जुलै

**सिंदखेडराजा :** परिवहन महामंडळाने सिंदखेडराजा आगारला दोन 'राष्ट्रमाता जिजाऊ' बसेस मंजूर केल्या आहेत. यातील एक बस सिंदखेडराजा-बुलढाणा मार्गावर, तर दुसरी बस ग्रामीण भागासाठी सुरू करण्यात आली आहे. राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या नावाने सुरू झालेल्या या बसेस सिंदखेडराजाला मिळाव्यात, अशी मागणी गेल्या अनेक दिवसांपासून होत होती.

सिंदखेडराजा ते बुलढाणा (सकाळी): ही बस दररोज सकाळी ८:०० वाजता सिंदखेडराजा येथून सुटेल. पुढे देऊळगाव राजा, देऊळगाव मही, अंधेरा आणि चिखली मार्गे ती बुलढाणा येथे पोहोचेल. बुलढाणा



ते सिंदखेडराजा (संध्याकाळी): परतीचा प्रवासासाठी ही बस बुलढाण्याहून दुपारी ४:०० वाजता निघेल आणि संध्याकाळी ६:३० वाजता सिंदखेडराजा येथे पोहोचेल, अशी माहिती एसटी महामंडळाने दिली आहे. दुसरी बसः देऊळगाव राजा, सिंदखेडराजा आणि परिसरातील ग्रामीण भागातील प्रवाशांच्या सोयीसाठी धावणार आहे. या निर्णयाबद्दल प्रवाशांनी एसटी महामंडळाचे आभार मानले आहेत. यावेळी आर. डी. पवार वाहतूक नियंत्रक परमेश्वर पवार चालक जी. डी. हिवाळे चालक परमेश्वर शिंगाडे वाहक आर डी भालेराव चालक एस. यु. जायभाये चालक पी. एस. मुधोळकर वाहक जी. एस. बिथरे चालक बुलढाणा जाणारी जाणारी प्रवासी प्रवासी यावेळी उपस्थित होते. यापूर्वीही सिंदखेडराजा बुलढाणा बस सेवा सुरू करण्यात आली होती. मात्र, जन्मस्थळ ते स्मृतिस्थळ : थेट बस सुरू करण्याची मागणी

या नवीन बसेस मिळाल्यानंतर, जिजाऊ भक्तांनी महामंडळाकडे एक अत्यंत महत्त्वाची आणि भावनिक मागणी केली आहे. राष्ट्रमाता जिजाऊंचे जन्मस्थळ 'सिंदखेडराजा' ते जिजाऊंचे स्मृतिस्थळ 'पाचाड (किल्ले रायगड)' या ऐतिहासिक मार्गावर थेट नवीन बस सेवा सुरू करण्यात यावी. ही सेवा सुरू झाल्यास लाखो जिजाऊ भक्तांना आणि पर्यटकांना एकाच फेरीत जिजाऊ जन्मस्थळ आणि रायगड या दोन्ही पवित्र स्थानांचे दर्शन घेणे सुलभहोणार आहे.

'अर्निंग' (उत्पन्न) मिळत नसल्याचे कारण पुढे करत ती बंद करण्यात आली. प्रवाशांच्या मते, पूर्वी ही बस सकाळी ६:०० वाजता सुटत असे. एवढ्या सकाळी बुलढाण्याला जाण्यासाठी प्रवासी मिळत नसत. मात्र, आता प्रशासनाने बदललेली सकाळी ८:०० वाजताची वेळ अत्यंत योग्य आहे. ही वेळ व्यापारी, शासकीय कर्मचारी आणि नागरिकांसाठी सोयीची असल्याने या गाडीला प्रवाशांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल, अशी खात्री व्यक्त होत आहे. त्यामुळे आता ही हक्काची बस सेवा कोणत्याही परिस्थितीत बंद होऊ नये, अशी मागणी सिंदखेडराजा तालुक्यातील जनतेकडून होत आहे.

# शाळांनो खबरदार, अन्नसुरक्षेचे पालन न केल्यास होईल कारवाई

## विद्यार्थ्यांना संतुलित व पौष्टिक आहार देणे शाळांची जबाबदारी

प्रतिनिधी १२ जुलै



अकोला: नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या दूध डेअरी, हॉटेल, औषध कंपन्या, तंबाखू व गुटखा कंपन्या, शीतपेय कंपन्या आदींना दणका दिल्यानंतर आता अन्न व औषध विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आता राज्यातील शाळांच्या कॅन्टीन आणि मध्यान भोजन देणाऱ्या स्वयंपाक घराची तपासणी मोहीम तीव्र केली आहे. विद्यार्थ्यांना सुरक्षित आरोग्यदायी आणि पौष्टिक अन्न मिळावे यासाठी अन्न व औषध विभागाने राज्यातील खाजगी शाळांमधील कॅन्टीन आणि मध्यान भोजन देणाऱ्या स्वयंपाक घराची तपासणी मोहीम तीव्र केली आहे अन्न व औषध विभागाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण अधिकारी शाळांचे मुख्याध्यापक आणि बचत गट चालकांसोबत एक महत्त्वाची बैठक झाली अन्नसुरक्षा आणि माना कायदा 2020 चे काटेकोरपणे पालन सुनिश्चित केले जाईल आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल असे स्पष्ट करण्यात आले शालेय स्तरावर विद्यार्थ्यांना अन्नसुरक्षा स्वच्छता आणि संतुलित व पौष्टिक आहार देणे ही सर्व संबंधित संस्थांची जबाबदारी आहे.

### तरशालेयव्यवस्थापनावर केली जाईल कारवाई

» अनेकदा शाळेतील मुलांना मध्यान आहारात अळ्या व किडे आढळून आल्याच्या घटना घडल्या आहेत जर कोणतीही शाळा किंवा मध्यान भोजन केंद्र मानकाचे उल्लंघन करत असल्याचे आढळल्यास व्यवस्थापनावर कारवाई केली जाईल.

त्यामुळे आता शाळा व्यवस्थापनाला मुलांना अन्नसुरक्षा स्वच्छता आणि संतुलित व पौष्टिक आहार देणे बंधनकारक राहील.

# शाळा परिसरात स्ट्रिंग बंद, पण अन्य शीतपेयांचे काय?

## अन्य शीतपेय विक्रीवर बंदी आणण्याची मागणी

प्रतिनिधी १२ जुलै



**अकोला:** राज्यात स्ट्रिंग नावाचे एनर्जी ड्रिंक पिल्याने नशा येत असल्याच्या तक्रारी आल्यानंतर अन्न व औषध विभागाने शाळेच्या परिसरात स्ट्रिंग एनर्जी ड्रिंक प्रतिबंधित केले. मात्र, इतर एनर्जी ड्रिंक्सचं काय? असा प्रश्न आता निर्माण झाला आहे. कारण अन्य थंड पेयातही कॅफेन आहे. त्यांना परवानगी आहे का? असा प्रश्न आता पुढे आला आहे.

**किती बँड बाजारात आहेत?**

सध्या बाजारात दहापेक्षा जास्त कॅफेन कंटेन्ट असलेली शीत पेये उपलब्ध आहेत. थंड पेयातही कॅफेन आहे. त्याचे प्रमाण कमी असले तरी तपासणी गरजेची आहे.

**काय परिणाम होतो?**

रक्तदाब, हार्ट अटॅक, मज्जासंस्था निकामी होणे असे परिणाम थंड पेयाच्या




अतिसेवनामुळे होतात.

अन्य शीतपेयांबद्दल प्रश्न उपस्थित होत आहेत.

परदेशी कंपन्यांनी थंड पेय आणि एनर्जी ड्रिंक्सच्या माध्यमातून आबालवृद्धांना याचं व्यसन लागल आहे. अनेक कंपन्या आणि त्यांचे ब्रँड सध्या बाजारात उपलब्ध आहेत. या एनर्जी ड्रिंक चे धोके लक्षात आल्यानंतर अनेक आमदारांनी विधानसभेत याबाबत प्रश्न उपस्थित केले. त्यानंतर अन्न व औषध विभागाने राज्यात सर्वात कारवाई केली; मात्र स्टिंगच्या बरोबरीने अनेक एनर्जी ड्रिंक्स आणि कॅफेन कन्टेन्ट असलेली थंड पेये बाजारात विकली जात आहेत. त्यांना परवानगी आहे का? असा प्रश्न निर्माण होत आहे.

# लक्झरी बसस्थानक परिसरात रस्त्यावर उभ्या बसेसचा वाहतुकीला अडसर

## रात्रीच्या वेळी तर वाहन चालवणे कठीण जाते लक्ष घालणे आवश्यक



प्रतिनिधी १२ जुलै

अकोला : लक्झरी बस स्थानक परिसरात खाजगी बसेस मोठ्या प्रमाणात उभ्या राहतात. प्रवासी तसेच नागरिकांची नेहमी गर्दी असते. त्यातच या भागात लक्झरी बसेस रस्त्यावर उभ्या राहतात. त्यामुळे खोळंबा होत आहे. गीता नगर, निमवाडी कडे जाणाऱ्या लोकांची गैरसोय होत आहे. येथील रहदारीला शिस्त लावावी अशी मागणी आहे. लक्झरी बस स्थानक परिसरात रस्त्यावर देखील वाहने उभी राहतात. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होते. याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. सततच्या प्रकारामुळे नागरिकांची ओरड सुरू झाली आहे. लक्झरी बसेस एकदा भरल्या की तेथून निघून जाणे अपेक्षित आहे. परंतु बसेस रस्त्यावर उभ्या राहतात. तेथे प्रवासी भरले जातात. दरम्यान येणाऱ्या जाणाऱ्या लोकांची गैरसोय होते. याबाबत तातडीने लक्ष द्यावे तसेच वाहने कशीही उभी करणा-यांवर कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे. नागरिक असंतोष व्यक्त करीत आहेत.

# 19 जुलैला निघणार जगन्नाथांची रथयात्रा

## 31 फूट उंच आणि 5 टन वजनाचा लोखंडी रथ तयार

प्रतिनिधी १२ जुलै



अकोला: शहरातील दीपक चौक खंगरपुरा भागातील 'विश्वकर्मा वर्कशॉप'मध्ये राजेश रामभाऊ सोनाळेकर यांच्याद्वारे भगवान श्रीजगन्नाथांसाठी ३१ फूट उंच आणि ५ टन वजनाचा महाकाय लोखंडी रथ तयार केला जात आहे. हा रथ पुरी येथील श्री जगन्नाथ रथाच्या प्रेरणेने निर्माण केलेली एक आधुनिक आणि कायमस्वरूपी प्रतिकृती राहील. १९ जुलै रोजी अकोला शहरात भव्य रथयात्रा काढण्यात येत आहे.

या रथाची रचना इंजिनिअर तनय सोनाळेकर यांनी तयार केली असून, याच्या निर्माण कार्यात महर्षी सोनाळेकर, निलेश सोनाळेकर, योगेश सोनाळेकर, परम, आराध्य आणि आर्या यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. रथाच्या रंगरंगोटीचे काम अनिल तायडे यांनी, इतर कामे मनोज सप्रे, तर शिखरासाठीचे वस्त्र निर्माण सुनील उंबरकर यांनी केले आहे.

या रथात फ्रंट व्हील ड्राईव्ह, स्टिअरिंग सिस्टम, अँडजस्टेबल शिखर आणि मॅन्युअल हायड्रॉलिक हँड ब्रेक यांसारख्या आधुनिक आणि सुरक्षित तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. सोनाळेकर कुटुंबाला रथ निर्मितीचा पिढ्यानपिढ्यांचा वारसा लाभला आहे. त्यांचे पूर्वज खंडूजी सोनाळेकर यांनी सोनाळा येथील सोनाजी महाराज मंदिराचा ऐतिहासिक तीन मजली लाकडी रथ बनवला होता. या दिव्य प्रकल्पाची प्रेरणा इस्कॉनच्या वैदर्भीचरण महाराज यांच्या संकल्पातून मिळाली आहे. या रथावर भगवान श्री जगन्नाथ, बलभद्र आणि माता सुभद्रा यांच्या मूर्ती विराजमान केल्या जातील. १९ जुलै २०२६ रोजी हा भव्य रथ पहिल्यांदाच अकोल्याच्या रस्त्यांवर ऐतिहासिक रथयात्रेत भाविकांद्वारे ७५० फूट लांब दोरीच्या साहाय्याने ओढला जाईल. हा रथ केवळ आस्थेचे प्रतीक नसून भक्ती, परंपरा, आधुनिक अभियांत्रिकी आणि भारतीय शिल्पकलेचा एक अद्वितीय संगम आहे.

# घोणस सापाच्या पिल्लांचे सुरक्षित रेस्क्यू

## सर्व सापांना सुरक्षितपणे जंगलात सोडण्यात आले

प्रतिनिधी १२ जुलै

**अकोला:** शहर व पर्यावरणासाठी कार्य करणारे सर्पमित्र चीकू इंगोले यांनी गडंकी परिसरात आढळलेल्या विषारी घोणस सापाला आणि त्याच्या पिल्लांना सुरक्षितपणे रेस्क्यू केले.

सापांच्या प्रजातींमध्ये घोणस साप हा सर्वात जास्त विषारी मानला जातो. सापांच्या इतर प्रजातींप्रमाणे घोणस सापाची मादी अंडी घालत नाही, तर थेट पिल्लांना जन्म देते. घोणस सापाची मादी एकाच वेळी २० ते ४० पिल्लांना जन्म देऊ शकते. अशीच एक घोणस मादी



शहरातील गडंकी परिसरात दिसून आली. परिसरातील घाबरलेल्या नागरिकांनी याची माहिती सर्पमित्र चीकू इंगोले यांना दिली. चीकू इंगोले यांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून या विषारी घोणस सापाला आणि तिच्या पिल्लांना सुरक्षितपणे पकडून जंगलात सोडून दिले. हा साप अत्यंत विषारी असल्याची माहिती सर्पमित्रांनी दिली.

# खोलेश्वर संस्थानच्या मालमत्ता गैरव्यवहारप्रकरणी सिटी कोतवालीत गुन्हा दाखल

प्रतिनिधी १२ जुलै

**अकोला** : अकोला शहरातील श्रीरामचंद्र खालेश्वर संस्थानच्या स्थावर व जंगम मालमत्तेच्या कथित गैरव्यवहारप्रकरणी सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सामाजिक कार्यकर्ते रमेश सुरेश गायकवाड यांनी केलेल्या तक्रारीवरून रामकिशारदास गुरु जयरामदास, चंदनदास गुरु रामकिशारदास व इतरांविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम 318(4), 335, 336(3) व 3(5) अन्वये गुन्हा क्रमांक 250/2026 दाखल करण्यात आला आहे. धर्मादाय विभागाच्या चौकशीत तक्रारीतील बाबी प्रथमदर्शनी निष्पन्न झाल्यानंतर आवश्यक परवानगी घेऊन ही कारवाई करण्यात आल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

फिर्यादीनुसार, श्रीरामचंद्र खालेश्वर संस्थान ही धर्मादाय आयुक्त कार्यालयात नोंदणीकृत सार्वजनिक धार्मिक संस्था आहे. या संस्थेच्या नावावर अकोला जिल्ह्यातील दैलखेड, भाकराबाद, जलालाबाद, सावरखेडा, कान्हेरी सरप, अधोळंदा, रुस्तमाबाद आदी गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर शेती आहे. तसेच संस्थेकडे सोन्या-चांदीचे दागिने व इतर मौल्यवान जंगम मालमत्ताही असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तक्रारीत म्हटले आहे की, संशयितांकडे संस्थेच्या मालमत्तेची केवळ देखरेख व व्यवस्थापन करण्याची जबाबदारी होती. त्यांना मालमत्तेवर कोणताही मालकी हक्क नव्हता. मात्र, त्यांनी कथितरीत्या बनावट कागदपत्रे तयार करून, महसूल अधिकाऱ्यांची दिशाभूल करत आणि महसूल नोंदींमध्ये फेरफार करून संस्थेच्या जमिनी स्वतःच्या नावावर करून घेतल्या. त्यानंतर या जमिनींची परस्पर विक्री करून कोट्यवधी रुपयांचा आर्थिक व्यवहार करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, या विक्रीतून मिळालेली रक्कम संस्थेच्या खात्यात जमा न करता स्वतःच्या खात्यात वळविण्यात आली. त्यामुळे संस्थेच्या निधीचा अपहार झाल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तसेच भूसंपादन विभागाकडून संस्थेला मिळालेली सुमारे 58 लाख रुपयांची भरपाईही संस्थेच्या खात्यात जमा न करता स्वतःच्या ताब्यात घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रारीत पुढे असेही नमूद करण्यात आले आहे की, संस्थेकडे सुमारे 255 तोळे सोन्याचे दागिने तसेच सुमारे एक किलो चांदीचे दागिने व भांडी होती. या मौल्यवान मालमत्तेची कोणतीही अधिकृत नोंद किंवा परवानगी न घेता विल्हेवाट लावण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. फिर्यादीनुसार, महंत जयरामदास यांच्या निधनानंतर रामकिशारदास यांची संस्थेच्या व्यवस्थापक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यांना केवळ 'केअरटेकर' म्हणून मालमत्तेची देखरेख करण्याचे अधिकार देण्यात आले होते. संस्थेच्या मालमत्तेवर मालकी हक्क देण्यात आलेला नव्हता. असे असतानाही स्वतःला मालक असल्याचा दावा करत न्यायालयीन आदेशांचा कथित गैरवापर करण्यात आला आणि महसूल अभिलेखांमध्ये फेरफार करण्यात आल्याचा आरोप आहे. तक्रारीत 1989 मधील दिवाणी न्यायालयातील प्रकरणाचाही उल्लेख करण्यात आला आहे. त्या प्रकरणातील पुढील न्यायालयीन आदेश आणि स्थगितीची माहिती महसूल विभागापासून लपवून संस्थेच्या जमिनी स्वतःच्या नावावर करून घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे न्यायालयीन आदेशांचे उल्लंघन झाल्याचाही दावा फिर्यादीने केला आहे.

कान्हेरी सरप, कोलखेड, अधोळंदा, रुस्तमाबाद आदी गावांतील विविध गट क्रमांकांच्या जमिनींबाबतही तक्रारीत सविस्तर उल्लेख करण्यात आला आहे. या जमिनींच्या नोंदी कथितरीत्या बदलून त्यांची विक्री करण्यात आली. या व्यवहारातून संस्थेचे अंदाजे 30 ते 40 कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. याशिवाय संस्थेची वार्षिक लेखापरीक्षणे, आर्थिक अहवाल आणि हिशेब धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे नियमित सादर करण्यात आले नसल्याचाही आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. त्यामुळे संस्थेच्या आर्थिक व्यवहारांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. सदर तक्रार १७ जुलै २०२५ रोजी पोलिसांकडे दाखल करण्यात आली होती. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार तिची चौकशी करण्यात आली. धर्मादाय विभागाच्या चौकशी अहवालात तक्रारीतील बाबी प्रथमदर्शनी आढळून आल्याने आवश्यक कायदेशीर परवानगी घेऊन सिटी कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात आता महसूल अभिलेख, धर्मादाय विभागाचे कागदपत्रे, न्यायालयीन नोंदी, जमिनींचे व्यवहार, बँक खात्यांमधील आर्थिक व्यवहार आणि संबंधित व्यक्तींची भूमिका यांचा सखोल तपास करण्यात येणार असल्याचे समजते. दरम्यान, या प्रकरणातील सर्व आरोप हे फिर्यादीने केलेल्या तक्रारीवर आणि पोलिसांनी नोंदविलेल्या प्रथम माहिती अहवालावर आधारित आहेत. पोलिस तपास करत आहे आरोपी फरार आहे.

# आईच्या किडनीने मुलाला नवे जीवन





प्रतिनिधी १२ जुलै

**अडगांव बु. :** येथून लागुनच असलेल्या शिवाजीनगर येथील एका मातेने आपल्या पोटच्या मुलाला स्वतःची किडनी दान करून त्याला नवजीवन दिले आहे. आईच्या या अथांग प्रेमामुळे एका २० वर्षीय तरुणाला नवीन आयुष्य मिळाले असून, या घटनेने 'आईच्या प्रेमाची अमूल्य परिभाषा' पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. शिवाजीनगर येथील रहिवासी विजय अढाऊ यांचा २० वर्षीय मुलगा कार्तिक हा मागील काही महिन्यांपासून मूत्रपिंडाच्या गंभीर आजाराने त्रस्त होता. त्याची प्रकृती खालावल्यामुळे त्याला सातत्याने डायलिसिसवर राहावे लागत होते. तरुण मुलाची ही अवस्था पाहून संपूर्ण अढाऊ कुटुंब चिंतेत होते. अखेर डॉक्टरांनी किडनी प्रत्यारोपणाचा सल्ला दिला. मुलाचे प्राण वाचवण्यासाठी आणि त्याला या वेदनेतून बाहेर काढण्यासाठी त्याची आई राजश्री अढाऊ यांनी स्वतःची किडनी देण्याचा धाडसी व भावनिक निर्णय घेतला. सर्व आवश्यक वैद्यकीय चाचण्या पूर्ण झाल्यानंतर, अमरावती येथील सुपर स्पेशालीटी हॉस्पीटल मधे आयुश्यमान भारत योजने अंतर्गत मोफत शस्त्रक्रिया तज्ञ वैधकीय अधिकारी डॉ.अमोल नरोटे,डॉ.मंगेश मेंढे,डॉ हितेश गुल्हाने,डॉ. राहुल पटोळे, यांच्या मार्गदर्शनाखाली हे किडनी प्रत्यारोपण यशस्वीरित्या पार पडले. सध्या माता आणि मुलगा दोघांचीही प्रकृती उत्तम असून, डायलिसिसच्या त्रासातून कार्तिकची सुटका झाली आहे. आपल्या पोटच्या गोळ्यासाठी स्वतःच्या शरीराचा भाग आनंदाने दान करणाऱ्या या मातेच्या मातृत्वाचे आणि त्यागाचे सर्वत्र गावात परीसरात कौतुक होत आहे.

# महायुती सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सिद्ध केले

## आमदार सावरकर यांच्या नेतृत्वाखालील आमदारांनी मानले मुख्यमंत्री फडणवीसांचे आभार

प्रतिनिधी १२ जुलै



अकोला: राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी 2019 च्या महात्मा ज्योतिबा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेमधील 13 लाख शेतकऱ्यांना 50 हजार रुपये ऐवजी 2 लाखापर्यंत कर्जमाफीचा ऐतिहासिक निर्णय सभागृहात जाहीर करून शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचं शासनाने सिद्ध केले आहे अशी प्रतिक्रिया आमदार रणधीर सावरकर यांनी व्यक्त केली.

विधिमंडळ प्रतोद महाराष्ट्र प्रदेश भाजपाचे माजी सरचिटणीस शेतकरी चळवळीतले अभ्यासू नेतृत्व आमदार रणधीर सावरकर यांच्या नेतृत्वाखाली विदर्भ मराठवाडा उत्तर महाराष्ट्रातील आमदारांच्या मागणीला बळ देऊन 13 लाख शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधिमंडळात घोषणा केल्यामुळे मिळणार आहे. मुख्यमंत्र्यांचे आभार आमदार सावरकर यांनी मानले.

आमदार रणधीर सावरकरांच्या नेतृत्वात विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रसह आदी. विभागातील विधानसभा सदस्यांनी मा. मुख्य मंत्री देवेंद्र जी फडणवीस यांना, शेतकऱ्यांना यापुर्वीच्या कर्जमाफी योजनेत सुद्धा आर्थिक दिलासा देण्यात यावा या करीता निवेदन दिले, शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्याकरिता एक व्यापक विचार करून शेतकऱ्यांना मदत करावी असा आग्रह शिष्टमंडळातील सर्व आमदारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आणि त्यालाच अनुसरून आज सभागृहात शेतकऱ्यांसाठी एक महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक घोषणा केली आमदार रणधीर सावरकरांनी सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशन २०२६ दरम्यान दि. 23 जून 2026 रोजी सत्तारूढ पक्षाकडून मांडण्यात आलेल्या 293 च्या प्रस्तावावर शेतकरी कर्जमाफीवर बोलतानाच शासनाकडे आग्रही मागणी करतांना भुमिका घेतली होती की, व शेतकऱ्यांच्या व्यथा समस्या अधिकाऱ्यांची भूमिका शासनाची योजना यासंदर्भात प्रखरपणे सभागृहात मांडली होती. राज्यातील शेतकऱ्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेद्वारे दोन लाख रुपयांची कर्जमाफी देण्यात असतानाच, सन 2019 च्या महात्मा ज्योतिबा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत ५०हजार रुपये ऐवजी या योजनेतील 13 लाख थकबाकीदार शेतकऱ्यांना सुद्धा पन्नास हजार ऐवजी दोन लाख रुपयांपर्यंत शासनाने शासनाने मदत करावी अशी मागणी केली होती , विदर्भ मराठवाडा उत्तर महाराष्ट्रातील आमदारांनी आपल्या निवेदनात मा. मुख्य मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली होती की, महायुती शासनाने दि. 02.06.2026 रोजीच्य शासन निर्णयान्वये पुन्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहिर केली आहे. सदर योजना राज्य शासनानी यापुर्वी राबविलेल्या सर्व कर्जमाफी योजनेपेक्षा मोठी असून या योजनेचा सुमारे 50 लाख पेक्षा जास्त शेतकऱ्यांना लाभ होणार आहे.

तथापि, शासन निर्णयातील मुद्दा क्र. ।ब (ii) मध्ये नमूद केलेल्या निकषाचा फेरविचार होणे आवश्यक आहे. सन 2019 च्या महात्मा ज्योतीबा फुले शेतकरी कर्ज मुक्त योजनेचा लाभ घेतलेल्या सुमारे 13 लाख थकबाकीदार शेतकऱ्यांना 2 लाखा ऐवजी केवळ रु. 50 हजार पर्यंतचा लाभ मिळणार आहे. सन 2021-22 व 2022-23 या वर्षात राज्यातील अनेक जिल्ह्यात अवर्षणाची परिस्थिती होती. या अवर्षण परिस्थितीमुळे अशा जिल्ह्यातील अनेक शेतकरी पुन्हा थकबाकीदार झाले आहेत. त्यामुळे या शेतकऱ्यांना देखिल रु. 2 लाखा पर्यन्त लाभ देण्याबाबत निर्णय घ्यावा. सन 2025-26 या वर्षात राज्यात सर्वक्ष अतिवृष्टीमुळे शेतकऱ्याचे नुकसान झाले असून सन 2026-27 या वर्षात संपूर्ण देशात अल निनो च्या प्रभावामुळे मौसमी पावसाचे उशिरा आगमन झाले आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यात अद्यापही पेरन्या झालेल्या नाहित. तसेच काही जिल्ह्यात जुलैच्या पहिल्या आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेऊन शासन निर्णयातील सदर मुद्यामधील सन 2025-26 व 2026-27 या आर्थिक वर्षातील पिक कर्जाची परतफेड करण्याची अट रद्द करण्यात यावी.सदर योजनेत दि. 01.04.2019 नंतर पिक कर्ज घतलेल्या शेतकऱ्यांना लाभ देण्यात येणार आहे. तथापि, सन 2019 पूर्वी राज्यातील अनेक जिल्ह्यात दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांच्या पिक कर्जाचे पुनर्गठन करण्यात आले आहे. त्यामुळे सन 2017-18 व 2018-19 या वर्षात ज्या जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती होती अशा जिल्ह्यातील पिक कर्जाचे पुनर्गघठन झाले आहे अशा शेतकऱ्यांचा देखिल योजनेत समावेश करावा करिता विनंती केली होती, त्याची पूर्तता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी करून शेतकऱ्यांच्या समस्या वेदना संवेदना राज्याची परिस्थिती समजून महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन इतिहासिक कर्जमाफीची घोषणा केली याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा ताई पवार व महायुती सरकारचे आभार मानून तमाम शेतकऱ्यांच्या वतीने अभिनंदन करून शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचे पुन्हा सिद्ध केल्याबद्दल धन्यवाद देऊन शेतकऱ्यांच्या विकासासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी सुरू असलेल्या योजनेला गती दिल्याबद्दल आमदार सावरकर व तमाम आमदारांनी अभिनंदन केले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135